cmyk

## संपादकीय

### कोचिंग संस्कृतीचा घातक चेहरा

देशातील सर्वसामान्य जनता महागाई, बेरोजगारी आणि भ्रष्टाचाराच्या विळख्यात होरपळत असतानाच 'नीट' परीक्षा पेपरफुटी प्रकरणाने संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचे भयावह वास्तव देशासमोर आणले आहे. ही केवळ एका परीक्षेची गळती नाही, तर देशातील गुणवत्तेवर, प्रामाणिकपणावर आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यावर झालेला थेट हल्ला आहे. या घोटाळ्यात काही प्राध्यापक, कोचिंग क्लासेस आणि शिक्षण क्षेत्रातील दलालांचा सहभाग उघड झाल्याने ''कुंपणच शेत खात असेल तर न्याय कुणाकडे मागायचा?'' हा प्रश्न आज प्रत्येक पालकाच्या मनात उभा राहिला आहे.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–६२ | शुक्रवार दि.२२ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### राजीव गांधींना स्मृतीदिनानिमीत्त अभिवादन

नवी दिल्ली: देशाचे माजी पंतप्रधान, भारतरत्न राजीव गांधींच्या स्मृतिदिनानिमित्त काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आदरांजली अर्पण केली. गुरुवारी सकाळी या सर्व नेत्यांनी राजीव गांधी यांच्या 'वीरभूमी' या समाधीस्थळी जाऊन आदरांजली अर्पण केली. यासह देशभरात ठिकठिकाणी काँग्रेस नेत्यांनी राजीव गांधींना अभिवादन केले. राजीव गांधींच्या पुण्यतिथीनिमीत्त पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी समाजमाध्यमांवर आपल्या भावना व्यक्त करत राजीव गांधींना आदरांजली अर्पण केली. राजीव गांधींच्या पुण्यतिथीनिमीत्त राहुल गांधींनी वडिलांच्या आठवणीत भावूक संदेश लिहिला. बाबा, आपण ज्या कुशल, समृद्ध आणि मजबूत भारताचे स्वप्न पाहिले होते, ते साकार करण्याची जबाबदारी मी पूर्ण करेन. आपली शिकवण, आपले संस्कार आणि आपल्या आठवणी कायम माझ्यासोबत राहतील, असा संदेश राहुल गांधींनी सोशल मीडियावर लिहिला.

### मदरशांमध्ये वंदे मातरम गायले जाणार नाही–कबीर

कोलकाता: पश्चिम बंगालमधील शुभेंदु सरकारने राज्यातील सर्व मदरशांमध्ये वंदे मातरम गाणे बंधनकारक केले आहे. सरकारच्या या निर्णयावर एजेयूपीचे अध्यक्ष आणि प. बंगालमध्ये बाबरी मशिदीच्या धर्तीवर मशीद बांधण्याची घोषणा करणारे हुमायू कबीर यांनी आव्हान दिले आहे. मदरशांमध्ये वंदे मातरम गायले जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. तसेच मदरशांच्या अंतर्गत बाबींमध्ये अशा प्रकारचे आदेश देण्याचा सरकारला कोणताही अधिकार नाही, असेही ते म्हणाले. पश्चिम बंगाल मदरसा शिक्षण संचालनालयाने राज्यभरातील सर्व सरकारी, अनुदानित आणि मान्यताप्राप्त मदरशांमध्ये वर्ग सुरू होण्यापूर्वी होणाऱ्या प्रार्थना सभेत वंदे मातरमचे गायन तात्काळ प्रभावाने अनिवार्य केले आहे.

### रेल्वे भरती आंदोलन गुन्ह्यातून राज ठाकरे निर्दोष

मुंबई: २००८ मधील रेल्वे भरती आंदोलनादरम्यान दाखल झालेल्या गुन्ह्यातून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची ठाणे सत्र न्यायालयाने गुरूवारी (दि. २१) निर्दोष मुक्तता केली. सरकारी पक्षाला न्यायालयात ठोस पुरावे सादर करता न आल्याने न्यायालयाने हा निर्णय दिला. भरतीदरम्यान मनसेच्या वतीने परप्रांतीय उमेदवारांविरोधात उग्र आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांना कथितरीत्या चिथावणी दिल्याचा आरोप राज ठाकरे यांच्यावर ठेवण्यात आला होता. याप्रकरणी ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या खटल्याच्या सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाला राज ठाकरे यांच्यावरील गुन्हा सिद्ध करता आला नाही, तसेच त्यांचा या गुन्ह्यातील थेट सहभाग स्पष्ट होईल असे कोणतेही ठोस पुरावे न्यायालयात मांडता आले नाहीत. त्यामुळे पुराव्याभावी राज ठाकरे यांना या प्रकरणातून निर्दोष मुक्त करत असल्याचे ठाणे सत्र न्यायालयाने आपल्या निकालात स्पष्ट केले.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२१ मे २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०५.५० क्विंटल | २,२०० | २,५९१ | २,३४५ |
| ज्वारी/हायब्रिड: १७५.०० क्विंटल | १,७०० | ४,८०४ | २,६२५ |
| मका/लोकल: ४.०० क्विंटल | १,८०० | १,८०० | १,८०० |
| तूर : २.५० क्विंटल | ७,२५० | ७,२५० | ७,२५० |
| उडीद : ३.५० क्विंटल | ५,५०१ | ६,१०० | ५,८६७ |
| बाजरी: ३८.५० क्विंटल | २,०६० | २,७०० | २,३१८ |
| मुग: ०.५० क्विंटल | ७,६५० | ७,६५० | ७,६५० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ५,८०१ | ५,८०१ | ५,८०१ |

# कर्जमाफीला आचारसंहितेचा अडथळा येणार नाही

## ३० जूनपूर्वी कर्जमाफी पूर्ण होणार ;मुख्यमंत्र्यांची ग्वाही

मुंबई । प्रतिनिधी

**विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लागू होणाऱ्या आचारसंहितेमुळे राज्यातील शेतकरी कर्जमाफीला विलंब होणार असल्याची चर्चा सुरू असतानाच मुख्यमंत्री यांनी गुरुवारी याबाबत मोठी घोषणा करत शेतकऱ्यांना दिलासा दिला. ''आम्ही ३० जूनपूर्वी कर्जमाफी पूर्ण करणार आहोत. त्यासाठी बँकांशी चर्चा झाली असून, निर्णय वेळेत अंमलात आणला जाईल,'' असा पुनरुच्चार मुख्यमंत्र्यांनी केला.**

**बँकांना सिबिलची सक्ती न करण्याचे निर्देश**

राज्यस्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री बोलत होते. त्यांनी स्पष्ट केले की, विधानपरिषदेचे मतदार असलेले महानगरपालिका सदस्य, जिल्हा परिषद सदस्य आदींना या कर्जमाफी योजनेतून वगळण्यात आले आहे. मात्र, आवश्यक असल्यास निवडणूक आयोगाची परवानगी घेऊन प्रक्रिया पूर्ण केली जाईल. ''कर्जमाफीचा निर्णय कोणत्याही परिस्थितीत वेळेत पूर्ण करू,'' अशी ठाम ग्वाही त्यांनी दिली. मुख्यमंत्री म्हणाले की, बहुतांश शेतकरी जूनच्या शेवटी किंवा जुलै महिन्यात खरीपासाठी पीककर्ज घेतात. त्यामुळे ३० जूनपूर्वी कर्जमाफी झाल्यास अधिकाधिक शेतकरी नव्याने कर्ज घेण्यासाठी पात्र ठरतील. ''आम्ही बँकांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत की, ज्या शेतकऱ्यांची यादी मंजूर झाली आहे, त्यांचे पैसे खात्यात जमा होण्यास उशीर झाला तरी त्यांना नवीन कर्ज द्यावे. शासनाकडून रक्कम जमा होणारच आहे,'' असे त्यांनी सांगितले. याचबरोबर, पीककर्ज वितरण करताना

▶▶ पान २ वर

### 'एल निनो' संकटामुळे प्रशासन सतर्क

यंदाच्या हंगामावर 'एल निनो'चे संकट असल्याने शासन सतर्क झाले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, यंदा दीर्घकालीन सरासरीच्या सुमारे ८८ टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे. विशेषत: पश्चिम विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील काही भागांमध्ये पावसाचा तुटवडा अधिक तीव्र असू शकतो. ''यंदा पावसाचा पॅटर्न उतरत्या क्रमाने राहण्याची शक्यता आहे. दोन पावसांतील अंतर वाढल्यास पिकांवर ताण येऊ शकतो,'' असे मुख्यमंत्री म्हणाले. या पार्श्वभूमीवर जलयुक्त शिवार योजनेची कामे वेगाने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले असून, जिल्हास्तरावर स्वतंत्र नियोजन सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

### बियाणे आणि खतांचा पुरेसा साठा

राज्यात खरीपासाठी आवश्यक असलेल्या बियाण्यांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली. राज्यात २०.१६ लाख टन बियाण्यांची गरज असताना सध्या २८ लाख टन बियाणे उपलब्ध आहेत. सोयाबीन, कापूस, मका आणि भात या प्रमुख पिकांच्या बियाण्यांचा मुबलक साठा असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी 'साथी' पोर्टल तयार करण्यात आले असून, या पोर्टलवर नोंदणीकृत बियाण्यांचीच खरेदी करण्याचे आवाहन त्यांनी केले. ''प्रमाणित बियाणे वापरल्यास शेतकऱ्यांचे नुकसान टळेल,'' असे त्यांनी नमूद केले.

# 'कॉकरोच जनता पार्टी'चे अकाउंट भारतात ब्लॉक

## इन्स्टाग्रामवर भाजपाला मागे टाकल्यानंतर कारवाई केल्याची चर्चा




मुंबई । प्रतिनिधी

**सोशल मीडियावर सद्या प्रचंड चर्चेत असलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी' संदर्भात मोठी घडामोड समोर आली आहे. इन्स्टाग्रामवर भाजपा च्या अधिकृत अकाउंटपेक्षा जास्त फॉलोअर्स मिळवल्यानंतर काही तासांतच त्यांचे अकाउंट भारतात ब्लॉक करण्यात आल्याचा दावा केला जात आहे.**

कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी सोशल मीडियावर स्क्रीनशॉट शेअर करत,

▶▶ पान २ वर

### अभिजीत दीपके यांचा पुढाकार

माध्यमांतील वृत्तानुसार, या मोहिमेचे संस्थापक अभिजीत दीपके असून ते पॉलिटिकल कम्युनिकेशन स्ट्रॅटेजिस्ट म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी पुण्यातून शिक्षण घेतले असून, पत्रकारितेची पदवी पूर्ण केली आहे. सध्या ते अमेरिकेतील बोस्टन युनिव्हरसिटी येथे पब्लिक रिलेशन्सचे शिक्षण घेत असल्याची माहिती समोर आली आहे. ते मुळचे मराठवाड्यातील संभाजीनगरचे असल्याचे सांगितले जात आहे.

### राजकीय वर्तुळातूनही प्रतिक्रिया

'कॉकरोच जनता पार्टी'च्या मोहिमेवर विविध राजकीय पक्षांकडूनही प्रतिक्रिया येत आहेत. विरोधी पक्षांनी ही मोहीम बेरोजगारी आणि तरुणांतील नाराजीचे प्रतीक असल्याचे म्हटले आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे नेते संजय राऊत यांनीही माध्यमांशी बोलताना, ''देशातील बेरोजगार तरुण किती अस्वस्थ आहेत, हे या मोहिमेतून दिसून येते,'' अशी प्रतिक्रिया दिली.

### सर्वोच्च न्यायालयातील वक्तव्यानंतर मोहिमेची सुरुवात

काही दिवसांपूर्वी बेरोजगारीसंदर्भातील एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी केलेल्या वक्तव्यानंतर ही मोहीम सुरू झाल्याचे सांगितले जात आहे. बेरोजगार युवक हे झुरळासारखे आहेत ते सोशल मीडिया किंवा माध्यमांमध्ये सक्रिय होतात आणि व्यवस्थेवर टीका करू लागतात, असे वक्तव्य त्यांनी केल्याचे वृत्त होते. या वक्तव्यावर देशभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या आणि त्यातूनच ही मोहिम सुरू झाली असून ती आता जगभरात प्रसिद्धीस आली आहे.

## ऑनलाईन सुनावणी सक्तीची करता येणार नाही–सरन्यायाधीश




नवी दिल्ली । वृत्तसंस्था

इंधन बचत करण्यासाठी दिल्लीतील सर्व न्यायालयांमध्ये व्हर्च्युअल (ऑनलाईन) सुनावणीची परवानगी देण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने नापसंती व्यक्त केली. सर्व न्यायालयांमध्ये व्हर्च्युअल (ऑनलाईन) सुनावणीची घेण्याची तोंडी विनंती करावी, अशी मागणी एका वकिलाने केली. यावर सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्ट केले की, हा विषय न्यायालयीन पातळीवर हाताळण्याचा नाही. यासोबतच, त्यांनी सर्व उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायमूर्तींना व्हर्च्युअल सुनावणीची परवानगी देण्याची विनंती आधीच केली असल्याचेही सांगितले. या विषयावर न्यायालयीन आदेश जारी करणे योग्य ठरणार नाही. मी आधीच मुख्य न्यायमूर्तींना विनंती

▶▶ पान २ वर

## विदर्भात उष्णतेची लाट कायम

### मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यातील काही भागात पावसाचा अंदाज



पुणे । प्रतिनिधी

पुढील ३ दिवस विदर्भातील तीन जिल्ह्यांमध्ये अतितिव्र उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. तर विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्येही उष्णतेच्या लाटेचा इशारा आहे. मध्य महाराष्ट्रात मात्र पावसासाठी पोषक हवामान असल्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

▶▶ पान २ वर

## मनोज जरांगेंच्या निकटवर्तीयाविरोधात इडी आणि आयकर विभागाकडे तक्रार

मुंबई । प्रतिनिधी

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला आता एक नवे आणि खळबळजनक वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जरांगे यांचे माजी सहकारी आणि सामाजिक कार्यकर्ते ह.भ.प. अजय महाराज बारस्कर यांनी जरांगे यांचे निकटवर्तीय पांडुरंग वसंतराव तारक यांच्याविरोधात सक्तवसुली संचालनालय (इडी) आणि आयकर विभागाकडे थेट लेखी तक्रार दाखल केली आहे.



आंदोलनाच्या आडून कोट्यवधी रुपयांची बेनामी मालमत्ता आणि उत्पन्नाच्या ज्ञात स्रोतापेक्षा अधिक संपत्ती गोळा केल्याचा गंभीर आरोप बारस्कर यांनी या तक्रारीत केला आहे. अजय महाराज बारस्कर यांनी मुंबई ईडी कार्यालयाकडे सादर केलेल्या तक्रार अर्जात म्हटले आहे की, पांडुरंग वसंतराव तारक हे मनोज जरांगे यांचे अत्यंत जवळचे सहकारी म्हणून सार्वजनिकरीत्या ओळखले जातात. काही वर्षांपूर्वीपर्यंत त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत सामान्य स्वरूपाची होती. त्यांच्या घराचे साधे प्लास्टर करण्यासाठीसुद्धा त्यांच्याकडे पैसे नव्हते, अशी स्थानिक पातळीवर

▶▶ पान २ वर

## राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत लवकरच दुरुस्ती – सुनील तटकरे

दिल्ली । वृत्तसंस्था

राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीच राष्ट्रीय कार्यकारिणीबाबत सोशल मीडियावर माहिती दिली आहे. याबाबत आमच्यात चर्चाही झाली असून, कशा पद्धतीने वाटचाल करायची, याचा निर्णय झाला आहे. यामुळे राष्ट्रीय कार्यकारिणीत येत्या काही दिवसांत दुरुस्तीचा निर्णय होईल, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते सुनील तटकरे यांनी स्पष्टीकरण दिले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नव्या



राष्ट्रीय कार्यकारिणीच्या यादीतून प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांची नावे वगळल्याने ते नाराज असल्याचे सांगितले जात होते. मात्र, या सगळ्या गोष्टींवर आता सुनील तटकरे यांनी स्पष्टीकरण दिले आहे. ते दिल्लीत प्रसारमाध्यमांशी संवाद साधत

▶▶ पान २ वर

## जागतिक पातळीवर पंतप्रधान रिजेक्ट माल

### काँग्रेस नेते नाना पटोले यांची टीका



मुंबई । प्रतिनिधी

पंतप्रधानांमुळे जागतिक पातळीवर देशाची मान शर्मेने खाली गेल्याची टीका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी केली आहे. जागतिक पातळीवर पंतप्रधान रिजेक्ट माल असल्याचे पटोले म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या परदेश दौऱ्यांवरून आणि त्या दरम्यान घडणाऱ्या घडामोडींवरून पटोले यांनी मोदींवर निशाणा साधला. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही सडकून टीका केली.

पंतप्रधानांच्या अशा वागण्यामुळे जागतिक पातळीवर भारताची मान शर्मेने खाली जात असल्याचे ते म्हणाले. पटोले म्हणाले,


▶▶ पान २ वर

# जगावर इबोला चे संकट!

## दिल्ली विमानतळावर अलर्ट जारी; भारत–अफ्रिका शिखर परिषदही पुढे ढकलली

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**अफ्रिका खंडात वाढत असलेल्या इबोला विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर भारत–अफ्रिका फोरम शिखर परिषद पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भारत सरकार आणि आफ्रिकन युनियन यांच्यातील चर्चेनंतर हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने गुरुवारी दिली.**




भारताच्या यजमानपदाखाली २८ ते ३१ मे २०२६ दरम्यान नवी दिल्लीत चौथ्या भारत–अफ्रिका फोरम शिखर परिषदेचे आयोजन करण्यात येणार होते. या परिषदेत अफ्रिका खंडातील विविध देशांचे राष्ट्रप्रमुख, मंत्री आणि वरिष्ठ प्रतिनिधी सहभागी होणार होते. भारत–अफ्रिका संबंध अधिक दृढ करणे तसेच व्यापार, आरोग्य, तंत्रज्ञान आणि विकास सहकार्याचा नवा रोडमॅप तयार करणे हा परिषदेचा उद्देश होता. परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ''परिषद आणि संबंधित बैठकींच्या नव्या तारखा परस्पर सल्लामसलतीनंतर निश्चित करण्यात येतील आणि योग्य वेळी जाहीर केल्या जातील.'' विशेष म्हणजे, ही परिषद तब्बल दहा वर्षांनंतर आयोजित होणार होती. यापूर्वी भारत–अफ्रिका फोरम शिखर परिषद २००८, २०११ आणि २०१५ मध्ये पार पडली होती. दरम्यान, केंद्र सरकारने इबोलाच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर उच्च जोखमीच्या देशांतून भारतात येणाऱ्या प्रवाशांसाठी बंदरे, विमानतळे आणि सीमावर्ती तपासणी केंद्रांवर विशेष आरोग्य सल्ला जारी केला आहे. परिषदेत सुमारे ४० देशांतील प्रतिनिधी सहभागी होणार होते. त्यापैकी काही देशांना इबोला संसर्गाच्या पार्श्वभूमीवर उच्च जोखीम श्रेणीत

▶▶ पान २ वर

### भारतात अद्याप रूग्ण नाही

केंद्रीय आरोग्य सचिव पुण्य सलिला श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक झाली. भारतात अद्याप इबोलाचा एकही रुग्ण आढळलेला नसल्याचे केंद्राने स्पष्ट केले. आफ्रिकेत सध्या इबोला विषाणूच्या एका दुर्मिळ अशा 'बंदीबुग्यो' या प्रकाराचा उद्रेक झाला आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जागतिक आरोग्य संघटनेने आणीबाणी घोषित केली आहे. काँगो हा देश या साथीचा मुख्य केंद्रबिंदू आहे. येथील 'इतुरी' प्रांतातून या आजाराची सुरुवात झाली असून तो आता इतर भागांतही पसरत आहे.

cmyk

## अग्रलेख

# कोचिंग संस्कृतीचा घातक चेहरा

देशातील सर्वसामान्य जनता महागाई, बेरोजगारी आणि भ्रष्टाचाराच्या विळख्यात होरपळत असतानाच ‘नीट’ परीक्षा पेपरफुटी प्रकरणाने संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचे भयावह वास्तव देशासमोर आणले आहे. ही केवळ एका परीक्षेची गळती नाही, तर देशातील गुणवत्तेवर, प्रामाणिकपणावर आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यावर झालेला थेट हल्ला आहे. या घोटाळ्यात काही प्राध्यापक, कोचिंग क्लासेस आणि शिक्षण क्षेत्रातील दलालांचा सहभाग उघड झाल्याने ‘‘कुंपणच शेत खात असेल तर न्याय कुणाकडे मागायचा?’’ हा प्रश्न आज प्रत्येक पालकाच्या मनात उभा राहिला आहे.

लातूरच्या आरसीसी क्लासेसचे संचालक शिवराज मोटेगावकर आणि निवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी यांना सीबीआयने अटक केल्यानंतर तथाकथित ‘कोचिंग संस्कृती’चे काळेकुट्ट वास्तव समोर आले आहे. ‘‘आम्ही डॉक्टर आणि इंजिनीअरची फॅक्टरी चालवतो’’ अशा जाहिराती देणाऱ्या संस्थांनी शिक्षणाला ज्ञानाचे माध्यम न ठेवता केवळ पैसा कमावण्याचा उद्योग बनवला. डॉक्टर किंवा अभियंता हे कारखान्यात तयार होणारे उत्पादन नाही; ते समाजासाठी जबाबदार नागरिक असतात, ही जाणीवच या व्यापारी व्यवस्थेने नष्ट केली आहे. खरं तर प्रश्न फक्त पेपरफुटीचा नाही; प्रश्न आहे शिक्षणाच्या व्यापारीकरणाचा. आज शाळा आणि महाविद्यालयांपेक्षा कोचिंग क्लासेस अधिक प्रभावशाली झाले आहेत. लाखो रुपयांच्या फी आकारून ‘‘यशाची हमी’’ विकणाऱ्या या संस्था पालकांच्या भीतीचा आणि विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा बाजार मांडत आहेत. ‘गेस पेपर’, ‘टॉपर्स बॅच’, ‘डमी स्कूल’, ‘खास नोट्स’ या नावाखाली विद्यार्थ्यांना यंत्रासारखे राबवले जात आहे. ज्ञान, विचारशक्ती आणि व्यक्तिमत्त्व विकास याऐवजी केवळ गुण आणि रँक यालाच शिक्षणाचा निकष बनवले गेले आहे. या संपूर्ण व्यवस्थेतील सर्वात दुर्दैवी बाब म्हणजे आर्थिक विषमता. महागड्या कोचिंग क्लासेसची फी परवडणाऱ्या श्रीमंत विद्यार्थ्यांना संधी मिळते, तर अत्यंत बुद्धिमान पण गरीब व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांची स्वप्ने आर्थिक अडचणींमुळे अर्धवट राहतात. कोटा, लातूरसारख्या शहरांमध्ये हजारो विद्यार्थी मानसिक तणावाखाली जगत आहेत. अनेक मुलांचे बालपण आणि तारुण्य केवळ स्पर्धा परीक्षांच्या नावाखाली संपत चालले आहे. शिक्षणाचा उद्देश माणूस घडवणे हा असतो; पण आज शिक्षण केवळ ‘रँक’ निर्माण करण्याचे साधन बनले आहे. ‘नीट’ घोटाळ्यामुळे सुमारे २२ लाख विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळ झाला आहे. ज्यांनी प्रामाणिकपणे वर्षभर मेहनत घेतली, त्यांच्यासाठी ही अन्यायाची परिसीमा आहे. आता फेरपरीक्षेची घोषणा झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या मानसिक तणावात आणखी भर पडली आहे. पेपर अधिक कठीण असेल का? पुन्हा अन्याय होणार नाही ना? या प्रश्नांनी विद्यार्थी आणि पालक दोघेही अस्वस्थ आहेत. सरकारने केवळ चौकशी करून थांबता कामा नये; दोषींना कठोर शिक्षा देऊन परीक्षा प्रणालीवरचा विश्वास पुन्हा निर्माण करावा लागेल. मात्र, उपाय फक्त कोचिंग क्लासेसवर कारवाई करण्यात नाही. शिक्षणव्यवस्थेची मुळापासून पुनर्बांधणी करावी लागेल. सरकारी आणि खासगी शाळांची गुणवत्ता इतकी सक्षम करावी लागेल की विद्यार्थ्यांना बाहेरील क्लासेसची गरजच भासू नये. तसेच समाजानेही डॉक्टर-इंजिनीअर यांच्यापुरतेच यशाचे मोजमाप न करता कौशल्याधारित, तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणालाही समान सन्मान द्यायला हवा. या घोटाळ्यामुळे ‘लातूर पॅटर्न’ बदनाम झाला, असे म्हणणे चुकीचे ठरेल. कारण हा पॅटर्न प्रामाणिक शिक्षक, मेहनती विद्यार्थी आणि शैक्षणिक निष्ठेच्या बळावर उभा राहिला होता. काही भ्रष्ट व्यक्तींनी केलेल्या कृत्यामुळे संपूर्ण परंपरेला दोष देता येणार नाही. मात्र या घटनेने शिक्षण क्षेत्रात शिरलेल्या पैशाच्या हव्यासाचे कुरूप वास्तव देशासमोर आणले आहे. शिक्षण हा समाजाचा तिसरा डोळा मानला जातो. तोच डोळा जर भ्रष्टाचाराच्या धुराने झाकला गेला, तर देशाच्या भविष्यात अंधार निर्माण होईल. त्यामुळे ‘नीट’ घोटाळ्याला केवळ एक परीक्षा गैरव्यवहार म्हणून न पाहता, शिक्षण क्षेत्रातील माफियाविरोधातील निर्णायक लढाई म्हणून पाहण्याची गरज आहे. अन्यथा उद्याची पिढी ज्ञानाने नव्हे, तर पैशाने घडवली जाईल आणि ते कोणत्याही राष्ट्रासाठी सर्वात मोठे अपयश ठरेल.

## मोदी साहेब, देवा भाऊ बीड नगरपालिकेसाठी ४८ करोड रुपयांचा निधी दिल्याबद्दल धन्यवाद-नगरसेवक गोविंद शिराळे

**बीड । प्रतिनिधी**

सध्या राज्यामध्ये देवा भाऊचे सरकार आहे आणि देशांमध्ये नरेंद्र भाई मोदीचे साहेबांचे सरकार आहे हे सरकार अतिशय सकारात्मक जनतेच्या सर्व सुविधा जनतेपर्यंत कशा पोहोचता येतील यासाठी सातत्याने प्रयत्नशील असते आणि सगळ्या योजना लोकांपर्यंत पोहोचून देण्यामध्ये आत्तापर्यंत यशस्वी ठरलेले आहे देवा भाऊचे आणि मोदी साहेबांचे सरकार आहे देव देश धर्म या साठी सातत्याने झटणारे भारताचे प्राईम मिनिस्टर मा श्री नरेंद्र जी भाई मोदी साहेब व महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस साहेब उर्फ सर्वांचे देवा भाऊ साहेब यांनी केंद्राकडे पाठपुरावा करून मोदी साहेबांच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या माध्यमातून बीड शहरासाठी तब्बल ४८ कोटी रुपयांचा निधी पाणीपुरवठा व स्वच्छता या साठी उपलब्ध करून दिल्याबद्दल मा मोदी साहेबांचे आणि देवा भाऊ चे खूप खूप आभार असे प्रसिद्धीस दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून बीड नगरपालिकेचे स्वीकृत नगरसेवक एडवोकेट गोविंद शिरोळे पाटील यांनी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात म्हटले आहे पुढे बोलताना नगरसेवक गोविंद शिराळे यांनी सांगितले की नगरपालिकेला ४८ कोटी रुपयाचा निधी प्राप्त होण्यामागे महाराष्ट्राच्या रणरागिनी पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचे खूप मोठे योगदान आहे तसेच बीड नगरपालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश जी फडसे साहेब व भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा अध्यक्ष मा शंकरराव देशमुख साहेब तसेच सर्जेराव तात्या तांदळे व भारतीय जनता पार्टीचे नेते मा उपाध्यक्ष नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील सह



या सर्वांचा ४८ रुपये करोड निधी बीड नगरपालिकेला मिळण्यासाठी केलेला खूप मोठा प्रयत्न यशस्वी झाला आहे याचे बिडकर यांना खूप मोठे समाधान आहे निधी प्राप्त करण्यासाठी हा पाठपुरावा करण्यामध्ये वरील सर्वांचा खूप मोठा सहभाग आहे म्हणून यांच्या पाठपुराव्याला सर्वांच्या बीड नगरपालिकेसाठी अतिशय जम्बो आतापर्यंत असा निधी इथून मागे कधी आलेले लोकांना माहीत नव्हता असा खूप मोठा ४८ करोड रुपयांचा निधी बीड नगरपालिकेला स्वच्छता पाणीपुरवठ्यासाठी प्राप्त झाला आहे आता या निधीचा सदुपयोग चांगल्या कार्यासाठी होणार आहे या बद्दल सर्व बीड शहरातील व बीड जिल्ह्यातील नागरिकांमधून सध्या समाधान व्यक्त होत आहे व भारताचे लाडके मा पंतप्रधान नरेंद्र जी भाई मोदी साहेब यांच्या उत्कृष्ट देव देश धर्म या कर्तव्याच्या बाबतीत व महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा श्री देवेंद्र जी फडणवीस साहेब उर्फ सर्वांचे देवा भाऊ फडणवीस साहेब तसेच महाराष्ट्राच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या सर्वांच्या उत्कृष्ट कार्याचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांच्या कार्याबद्दल सर्व बीड जिल्ह्यातील नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे असेही दिलेल्या प्रसिद्ध पत्रकामध्ये एडवोकेट तथा नगरसेवक गोविंद शिरोळे पाटील यांनी म्हटले आहे .

## आडत मार्केटमध्ये व्यापाऱ्यांचे अतिक्रमण भिंती फोडून शेड उभारले!

### नगरपरिषद प्रशासनाला मोतिबिंदू झालाय काय?-डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील आडत मार्केट परिसरात नगरपालिकेच्या जागेवर व्यापाऱ्यांनी भिंती फोडुन अनधिकृत पत्राशेड उभारून अतिक्रमण केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. भाजी मंडईतील लहान व्यावसायिकांवर कारवाई करणारे नगरपरिषद प्रशासन आडत मार्केटमधील धनदांडग्या व्यापाऱ्यांच्या अतिक्रमणाकडे मात्र डोळेझाक करत असल्याने नगरपरिषद प्रशासनाला मोतिबिंदू झालाय का? अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली.**



डॉ. ढवळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, नगरपालिकेने आडत मार्केटमधील गाळे भाडे तत्वावर दिलेले असताना काही व्यापाऱ्यांनी नगरपालिकेच्या भिंती फोडून त्या ठिकाणी बेकायदेशीर पत्राशेड उभारले आहेत. दिवसाढवळ्या तोडफोड करून नगरपालिकेच्या मालमत्तेचे नुकसान करण्यात आले असून मोकळ्या जागेवर अतिक्रमण करण्यात आले आहे. ‘‘भाजी व फळ विक्रेत्यांवर दांडगाई करणाऱ्या प्रशासनाला हे अतिक्रमण दिसत नाही काय? मुख्याधिकारी शैलेश फडसे यांना मोतिबिंदू झालाय का?’’ असा संतप्त सवाल डॉ. ढवळे यांनी उपस्थित केला आहे. नगरपालिकेचे स्वच्छता निरीक्षक भागवत जाधव यांनी दि.७ एप्रिल २०२६ रोजी संबंधित सहा व्यापाऱ्यांना चार दिवसांत अतिक्रमण काढण्याच्या नोटिसा बजावल्या होत्या. अन्यथा कारवाईचा इशाराही देण्यात आला होता. मात्र महिनाभराहून अधिक कालावधी उलटूनही परिस्थिती जैसे थे असल्याचे दिसून येत आहे. नोटीस देणाऱ्या नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनाही काही व्यापाऱ्यांकडून राजकीय पाठबळाच्या जोरावर अरेरावीची भाषा केली जात असल्याची चर्चा परिसरात सुरू असल्याचेही डॉ. ढवळे यांनी म्हटले आहे.

## अक्षरांची सेवा करणाऱ्या बीडच्या गुणवंत सराफ यांचा राज्यस्तरीय गौरव

**बीड । प्रतिनिधी**

**‘कला हेच जीवन‘‘ हा मंत्र घेऊन गेली अनेक वर्षे सुलेखन आणि फलकलेखनाच्या माध्यमातून समाजाला जोडणारे बीडचे कलाकार गुणवंत बाळासाहेब सराफ यांना यंदाचा ’राज्यस्तरीय अक्षर गौरव पुरस्कार २०२६’ जाहीर झाला आहे. हा पुरस्कार पंढरपूर येथे दि. २, २३ व २४ मे २०२६ रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय अक्षर संमेलन*मध्ये दि. २४ मे रोजी प्रदान केला जाणार आहे. संमेलनाचे आयोजन स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर येथे करण्यात आले आहे.**



मूळचे बीडचे असले गुणवंत सराफ सध्या पुण्यात स्थायिक आहेत. त्यांचा प्रवास पारंपरिक वॉलपेंटिंग आणि हाताने लिहिलेल्या बॅनरपासून सुरू झाला. काळानुसार त्यांनी डिजिटल सुलेखन, रांगोळी आणि फलकलेखन या माध्यमांमध्येही आपली छाप उमटवली. त्यांच्या लेखनशैलीत मराठी अक्षरांची बांधणी, ठळकपणा आणि कलात्मकता यांचा सुरेख मिलाफ दिसतो. ’माझी शाळा माझा फळा’ या शैक्षणिक समूहासोबत जोडून त्यांनी शाळा-महाविद्यालयांमध्ये सुलेखनाचे महत्त्व पोहोचवण्याचे काम केले आहे. समाज माध्यमांवर त्यांचे काम हजारो लोकांपर्यंत पोहोचते. आयोजक अमित भोरकडे यांच्या मते, लोप पावत चाललेल्या हस्तलेखन आणि सुलेखन कलेला पुनरुज्जीवन देणे आणि या क्षेत्रात योगदान देणाऱ्या कलाकारांना व्यासपीठ मिळवून देणे हा या संमेलनाचा उद्देश आहे. गुणवंत सराफ यांचे कार्य याच दिशेने प्रेरणादायी आहे. या सोहळ्याचे स्वागताध्यक्ष नरेंद्र महाडीक आणि समन्वयक शुभम गायकवाड आहेत. बीड जिल्ह्यातील एका मेहनती कलाकाराला राज्यस्तरावर मिळालेला हा सन्मान स्थानिक कलाकारांसाठी मोठी प्रेरणा आहे. सराफ सरांच्या या यशाबद्दल जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## समीर शेख बीडचे अप्पर पोलीस अधिक्षक

**बीड । प्रतिनिधी**

**सचिन पांडकर यांची धाराशिवला बदली झाली झाल्यानंतर त्यांच्या रिक्त झालेल्या जागी राज्य नियंत्रण कक्षातून समीर शेख यांची वर्णी लागली आहे.**



बीड जिल्ह्यात मागच्या साडेतीन वर्षात सचिन पांडकर यांनी पोलीस दलात केलेले कार्य जिल्हावासियांच्या स्मरणात राहणारे ठरणार आहे.बीडची जाळपोळ, जातीय तणाव,संतोष देशमुख हत्या प्रकरणासारख्या अनेक गंभीर प्रकरणात त्यांनी ठोस भूमिका घेऊन कायद्याचा ’धाक’ कायम ठेवण्यासाठी मोठा प्रयत्न केला होता.पोलीस दलातील आश्वासक चेहरा म्हणून देखील त्यांच्याकडे पहिले जात होते.बीड जिल्ह्याच्या इतिहासात पहिल्यांदाच पांडकर यांच्या रूपाने साडेतीन वर्ष काम करण्याची संधी मिळाली होती.त्यांच्या बदलीनंतर बीडला कोणाची वर्णी लागते याच्या मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरु असताना समीर शेख हे बीडला येत आहेत.

## जालना येथे रेशीम विणकाम वाढविण्यास मोठी संधी-आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी**

**कृषी विज्ञान केंद्र, खरपुडी येथे आयोजित करण्यात आलेल्या रेशीम हातमाग प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप व प्रमाणपत्र वितरण सोहळा आज उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात जिल्ह्यातील महिलांना रेशीम साडी विणकामाच्या माध्यमातून स्वावलंबी बनविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, जालना येथे रेशीम विणकाम वाढविण्यास मोठी संधी उपलब्ध झाली आहे.**

जालना जिल्ह्यात कोष बाजारपेठ, रेशीम धागा निर्मिती आदी प्रक्रिया सुरू असून आता त्यापुढील टप्पा म्हणून रेशीम साडी विणकामाचे काम सुरू करून एक नाविन्यपूर्ण आदर्श निर्माण करण्यात आला आहे. जालना जिल्ह्यास व्यापाराचा समृद्ध वारसा लाभला असून येथे अनेक उद्योजक कार्यरत आहेत. त्यामुळे केवळ ३० महिला विणकरांपुरते हे कार्य मर्यादित न ठेवता पुढील काळात आणखी ५०० महिलांना रेशीम



विणकामाचे प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच प्रशिक्षणार्थी महिलांनी विणकामात अधिक प्राविण्य मिळवून आकर्षक डिझाईन्स व भरजरी उत्पादने तयार करावीत, असे आवाहनही त्यांनी केले. कापसे फाउंडेशनचे संस्थापक बाळासाहेब कापसे यांनी प्रशिक्षणार्थी महिलांना सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले. अधिक प्रशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या महिलांना मोफत प्रशिक्षण तसेच मोफत हातमाग उपलब्ध करून देण्यात येतील. महिलांनी तयार केलेल्या रेशीम साड्यांच्या विक्रीची हमी देखील त्यांनी दिली.

मराठवाडा शेती सहाय मंडळाचे सेक्रेटरी कृषीरत्न श्री. विजय आण्णा बोराडे यांनी कृषी विज्ञान केंद्र सदैव प्रशिक्षणार्थी महिलांच्या पाठीशी राहील, असे सांगितले. महिलांना आवश्यक पुढील कौशल्य प्रशिक्षण दिले जाईल तसेच ग्रामीण भागातील महिलांनी पुढाकार घेऊन आर्थिक उन्नती साधावी, असे आवाहन त्यांनी केले. प्रशिक्षणार्थी महिला सौ. निता नागवे, सौ. सरीता निकाळजे आणि सौ. गंगाबाई कचरे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ‘‘आम्ही आता रेशीम साडीचे विणकाम करू शकतो, याचा आम्हाला खूप आनंद आहे. या प्रशिक्षणामुळे कौशल्य आत्मसात झाले असून आमचा आत्मविश्वास वाढला आहे. तसेच सन्मानाने रोजगार व उत्पादन वाढविण्याचा मार्ग उपलब्ध झाला आहे.

## पान १ वरून...

### कर्जमाफीला आचारसंहितेचा

शेतकऱ्यांकडून ‘सिबिल स्कोअर’ची सक्ती करू नये, असे स्पष्ट निर्देशही बँकांना देण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ‘‘सिबिलच्या कारणावरून कोणत्याही शेतकऱ्याची अडवणूक होऊ देणार नाही,’’ असेही त्यांनी नमूद केले. खरीप हंगामाच्या तयारीसाठी झालेल्या बैठकीपूर्वी राज्यस्तरीय बँकिंग समितीची बैठकही पार पडल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. राज्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांना पीककर्ज मिळावे, यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे. राज्यातील जिल्हा सहकारी व ग्रामीण बँका मिळून सुमारे ६७ टक्के शेतकऱ्यांना कर्ज पुरवतात, तर राष्ट्रीयकृत बँकांचा वाटा केवळ २६ टक्के असल्याचे त्यांनी सांगितले. सहकारी आणि ग्रामीण बँकांनी कर्जवाटपाचे उद्दिष्ट ८० टक्क्यांपर्यंत नेले असताना राष्ट्रीयकृत बँकांचे उद्दिष्ट केवळ ६७ टक्क्यांवर असल्याबद्दल नाराजी व्यक्त करत, ‘‘राष्ट्रीयकृत बँकांनीही ८० टक्क्यांहून अधिक उद्दिष्ट पूर्ण केले पाहिजे,’’ असे कडक शब्दांत सांगितल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

----------

### ऑनलाईन सुनावणी सक्तीची

केली आहे. बहुतेकांनी याची अंमलबजावणीही केली आहे. ही वकील संघटना आणि न्यायपीठ दोघांनीही स्वेच्छेने करायची गोष्ट आहे. जेव्हा वकिलाने देशहितासाठी दिल्लीतील सर्व जिल्हा न्यायालयांमध्ये व्हर्च्युअल सुनावणीची मागणी करत असल्याचे सांगितले, तेव्हा सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले की, जिल्हा न्यायालये ही उच्च न्यायालयांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असतात आणि त्याबाबतचा निर्णय उच्च न्यायालयांनीच घेणे योग्य ठरेल. सरन्यायाधीश म्हणाले, जिल्हा न्यायालये हा उच्च न्यायालयांचा अधिकारक्षेत्रातील विषय आहे. उच्च न्यायालयांकडे त्याचे प्रशासकीय नियंत्रण असते, त्यांनाच यावर निर्णय घेऊ द्या. मी पत्राद्वारे त्यांना जिल्हा न्यायालयांसाठीही व्हर्च्युअल सुनावणीबाबत विनंती केली आहे. केंद्र सरकारच्या इंधन बचत उपायांना पाठिंबा देत सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच काही तात्कालिक प्रशासकीय निर्णय घेतले होते, ज्यामध्ये ठराविक श्रेणीतील खटल्यांसाठी व्हर्च्युअल सुनावणी बंधनकारक करण्यात आली होती. हा नियम संकीर्ण कामकाजाचे दिवस (सोमवार आणि शुक्रवार) तसेच न्यायालयाच्या अर्धवेळ कामकाजाच्या दिवसांसाठी लागू करण्यात आला होता. वकील संघटनेच्या सदस्यांच्या विनंतीचा विचार करून न्यायालयाने एक स्पष्टीकरण जारी केले होते. त्यानुसार, वकिलांना व्हर्च्युअल पद्धतीने उपस्थित राहण्यासाठी प्रोत्साहित केले जात असले, तरी काही अपरिहार्य कारणांमुळे जे वकील तसे करू शकत नाहीत, ते प्रत्यक्ष न्यायालयात हजर राहू शकतात, असे सांगण्यात आले होते. अमेरिका आणि इराणमधील संघर्षानंतर निर्माण झालेल्या पश्चिम आशियातील संकटामुळे सरकारने इंधन बचतीचे उपाय लागू केले आहेत.

----------

### ‘कॉकरोच जनता पार्टी’चे

‘‘अपेक्षेप्रमाणे, कॉकरोच जनता पार्टीचे अकाउंट भारतात ब्लॉक करण्यात आले आहे,’’ अशी प्रतिक्रिया दिली. या पोस्टनंतर सोशल मीडियावर चर्चेला उधाण आले. एक्स कडून किंवा संबंधित अधिकृत संस्थांकडून याबाबत कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण समोर आलेले नाही. काही अहवालांनुसार, कॉकरोच जनता पार्टीने इंन्सटाग्रामवर १० दशलक्षांहून अधिक फॉलोअर्स मिळवत भाजपच्या अधिकृत अकाउंटला फॉलोअर्सच्या बाबतीत मागे टाकले. या अचानक वाढलेल्या लोकप्रियतेमुळे ‘कॉकरोच जनता पार्टी’ इंटरनेटवरील चर्चेचा विषय ठरत आहे. ‘कॉकरोच जनता पार्टी’ हा पारंपरिक राजकीय पक्ष नसून व्यंग, मीम्स आणि डिजिटल आंदोलनाचे मिश्रण असलेली सोशल मीडिया मोहीम आहे. बेरोजगारी, पेपरफुटी, राजकीय वातावरण आणि तरुणांमधील नाराजी या मुद्द्यांवर ही मोहीम जोरदार चर्चेत आली आहे. स्वतःला ‘‘तरुणांची, तरुणांसाठी आणि तरुणांनी उभारलेली चळवळ’’ असे सांगणाऱ्या या मोहिमेने काही दिवसांतच मोठा डिजिटल प्रभाव निर्माण केला आहे.

----------

### राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत

होते. सुनील तटकरे म्हणाले, निवडणूक आयोगाला लिहिण्यात आलेल्या पत्राबाबत सुनेत्रा पवार, प्रफुल तटकरे, छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ, पार्थ पवार अशी चर्चा झाली आहे. तो विषय पूर्णपणे संपुष्टात आला आहे. मी सगळे पत्र वाचले आहे. माझा ४२ वर्षांचा प्रवास आहे. सगळे वाचत-वाचत इथपर्यंत आलो आहे. तालुका अध्यक्ष, जिल्हा अध्यक्ष, संघटनेत अध्यक्ष, जिल्हा परिषद अध्यक्ष, पाचवेळा आमदार, मंत्री राहिलोय, दोनदा खासदार म्हणून निवडून आलो. मागच्या मार्गाने नाही आलो. सगळे कागद वाचले आहेत. पुनर्पत्र पाठवण्यात येईल. कुठलाही समज गैरसमज पक्षात उरला नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. शरद पवारांची प्रकृती ठीक नव्हती. त्यामुळे शरद पवार यांची भेट घेत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. यात कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही. मी राष्ट्रवादीचा प्रदेशाध्यक्ष म्हणून काम करतो. अशावेळेला राजकीय चर्चा झाली नाही. शरद पवारांकडे कुठलीही तक्रार केली नाही. तसेच पार्थ पवार, जय पवार हे अजित पवारांच्या निधनानंतर सक्रीय राजकारणात सहभागी झाले आहेत. ते तरूण नेतृत्त्व आहेत. त्यांच्याबद्दल तक्रार असण्याचे कारण काय? उलट अजित पवारांच्या समवेत राजकीय प्रवास केल्यामुळे योग्यवेळी योग्य मार्गदर्शन, त्यांची आणि आमची भूमिका समजून घेऊन चर्चा करून आम्ही वाटचाल करत असतो, असे तटकरेंनी सांगितले.

--------

### मनोज जरांगेंच्या निकटवर्तीयाविरोधात

चर्चा होती. तसेच, पारंपरिक शेतीव्यतिरिक्त त्यांच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही मोठे कायदेशीर किंवा अधिकृत साधन नाही. परंतु, मराठा आरक्षणाचे आंदोलन सुरू झाल्यानंतर अत्यंत कमी कालावधीत तारक यांच्या जीवनशैलीत आणि मालमत्तेत संशयास्पद आणि अवाढव्य वाढ झाली आहे. अजय महाराज बारस्कर यांनी ईडीकडे केलेल्या तक्रारीत पाच प्रमुख मागण्या केल्या आहेत. पांडुरंग वसंतराव तारक व त्यांच्याशी संबंधित व्यक्तींच्या मालमत्तेची केंद्रीय यंत्रणेमार्फत सखोल चौकशी करण्यात यावी. त्यांच्या उत्पन्नाच्या ज्ञात स्रोतांची आणि बँक खात्यांची सविस्तर तपासणी करण्यात यावी. नुकत्याच खरेदी केलेल्या ९.०८ हेक्टर शेतीसाठी वापरण्यात आलेल्या पैशांचा मुख्य स्रोत तपासण्यात यावा. आवश्यकतेनुसार त्यांचे बँक खाते, आयकर विवरणपत्र आणि मालमत्ता व्यवहारांची चौकशी व्हावी. या व्यवहारात मनी लॉन्ड्रिंग बेहिशेबी मालमत्ता, बेकायदेशीर आर्थिक व्यवहार आढळून आल्यास संबंधित कायद्यांनुसार तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई व्हावी.

-----------

### विदर्भात उष्णतेची

विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये ऊन असह्य होत आहे. अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यात काही ठिकाणी अतितीव्र उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. त्यानंतर दोन दिवस या तिन्ही जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला. तसेच यवतमाळ, नागपूर, गडचिरोली, गोंदीया आणि चंद्रपूर जिल्ह्यात पुढील ५ दविस उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. दुसरीकडे मध्य महाराष्ट्रातील पुणे, कोल्हापूर आणि सातारा तसेच कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात काही ठिकाणी वादळी पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. तर कोल्हापूर, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यातील काही भागात पुढील ५ दिवस ढगाळ हवामानासह हलक्या पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. ठाणे, रायगड, नाशिक, अहिल्यानगर, सांगली, सोलापूर, बीड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात पुढील ३ दिवस हलक्या पावसाचा अंदाज देण्यात आला आहे.

**मॉन्सून जागेवरच थबकला**

मॉन्सूनने गुरूवारीही पुढे वाटचाल केली नाही. मॉन्सूनच्या वाटचालीसाठी मात्र पोषक हवामान आहे. त्यामुळे मॉन्सून पुढील ३ ते ४ दिवसांमध्ये अंदमान समुद्राचा उरलेला भाग, नैऋत्य अरबी समुद्राचा काही भाग, कोमोरिन भाग, नैऋत्य आणि आग्नेय बंगालचा उपसागर आणि पूर्वमध्य बंगालच्या उपसागराचा काही भाग व्यापेल, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

----------------

### जगावर इबोला

समाविष्ट करण्यात आले आहे. भारताने आफ्रिकेतील नागरिक आणि सरकारांसोबत एकात्मता व्यक्त करत आरोग्यविषयक संकटावर मात करण्यासाठी आवश्यक त्या सर्व सहकार्याची तयारी दर्शविली आहे. आफ्रिकेतील इबोला प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर विशेष आरोग्य सल्ला जारी करण्यात आला आहे. काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदानमधून येणाऱ्या किंवा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना ताप, उलटी, जुलाब, घशात वेदना अथवा रक्तस्रावाची लक्षणे आढळल्यास तातडीने आरोग्य अधिकाऱ्यांना माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. इबोला बाधित रुग्णांच्या संपर्कात आलेल्यांची तपासणी केली जाणार आहे.

----------

### जागतिक पातळीवर

देवेंद्र फडणवीस नेहमी सांगतात की, पंतप्रधानांच्या परदेश दौऱ्यांमुळे देशाचा फायदा होतो, अनेक महत्त्वपूर्ण करार केले जातात. मात्र, आता फडणवीसांनीच यावर उत्तर दिले पाहिजे की, इटलीमध्ये जाऊन तिथल्या महिला राष्ट्राध्यक्षांना चॉकलेटची भेट देणे कितपत योग्य आहे? पंतप्रधानांचे हे वर्तन हास्यास्पद असल्याचे सांगत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. काही दिवसांपूर्वी राहुल गांधी यांच्यावर रिजेक्ट माल म्हणून टीका करणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांचा समाचार घेतला. जे राहुल गांधींना रिजेक्ट माल म्हणत होते, त्यांनी आता पाहावे की, त्यांचे स्वतःचे पंतप्रधान आज जागतिक पातळीवर रिजेक्ट माल ठरत आहेत, असे पटोले म्हणाले. पंतप्रधानांच्या परदेश दौऱ्यांमुळे देशावर मोठा आर्थिक भार पडत असून, या दौऱ्यांमधून देशाच्या पदरात काय पडले?, असा सवालही उपस्थित केला. नुकतेच सर्वोच्च न्यायालयातील एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायमूर्तींनी तरुण पिढीचा उल्लेख कॉकरोच असा केला. या वक्तव्यावरून आणि सोशल मीडियावर सुरू असलेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या ट्रेन्डवरून पटोले यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. देशातील तरुण पिढीचा सातत्याने होणारा अपमान आणि वाढती बेरोजगारी यांमुळेच तरुणांमध्ये केंद्र सरकारविरोधात तीव्र असंतोष असल्याचे ते म्हणाले. देशाच्या तरुण पिढीला अशा पद्धतीची उपमा दिली जाणे आणि त्यांची सामाजिक व्यवस्थेमध्ये अशी संभावना होणे अत्यंत दुर्दैवी असल्याचे पटोले म्हणाले.

## थोडक्यात



माजलगाव :- तालुक्यातील पुरुषत्तोमपुरी येथील भगवान पुरुषोत्तमाच्या दर्शनासाठी परतुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनरावजी लोणीकर यांच्या पत्नी व मुलगी मीनाताई पवार सभापती महिला बालकल्याण जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर ह्या आल्या असता भगवान पुरुषोत्तम कमिटी व गावकऱ्यांच्या वतीने त्यांचे सत्कार करून स्वागत करण्यात आले



### प.पु गुरुमाऊली यांच्या आदेशाने दोन गावात नदी स्वच्छता अभियान

माजलगाव । प्रतिनिधी

श्री.स्वामी समर्थ परम पूज्य गुरुमाऊली यांच्या कृपाशीर्वादाने मौजे घळाटवाडी,ढोरगाव या दोन्ही केंद्राच्या वतीने दि २१ मे गुरुवार रोजी गंगा दशहरा निमित्ताने नदी स्वच्छता अभियान व मानसन्मान सेवाचे आयोजन करण्यात आले होते.या नदी स्वच्छता अभियान राबविण्यात माजलगाव,घळाटवाडी व ढोरगाव केंद्राच्या माध्यमातून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या साठी गावात जेष्ठ नागरिक व महिला भक्त उपस्थित होते.

### शांतीनाथ मळेकर यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील आर्वी येथील रहिवासी शांतिनाथ गणपतराव मळेकर (वय ६७ वर्षे) यांचे मंगळवारी हृदयविकाराच्या तिव्र झटक्यानेनिधन झाले. शांतिनाथ मळेकर यांनी मुंबईतील नामांकित 'व्हीजेटीआय' संस्थेतून 'डिप्लोमा इन मेकॅनिकल व ऑटोमोबाईल इंजिनिअरिंग'चे शिक्षण पूर्ण केले होते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी काही काळ 'गजानन सहकारी साखर कारखाना' येथे आपली सेवा दिली. त्यानंतर त्यांनी ऑटोमोबाईल क्षेत्रातील नामांकित 'बजाज टेम्पो' कंपनीतही काही वर्षे यशस्वीरित्या नोकरी केली. ते सार्वजनिक बांधकाम विभागाचे सेवानिवृत्त चीफ इंजिनिअर दिगंबर मळेकर यांचे लहान बंधू होत.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा एक मुलगा सार्वजनिक बांधकाम विभागात शाखा अभियंता आहे तर एक मुलगा टाटा कन्सल्टन्सी मध्ये कार्यरत आहे.

### पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत भक्ती गंगणे पात्र

माजलगाव । प्रतिनिधी



येथील सिंदफाना पब्लिक स्कूल ची इयत्ता ८ वी तील विद्यार्थीनी कु.भक्ती बालासाहेब गंगणे हिने पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत २९८ पैकी १२८ गुण घेत पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरली आहे. कु.भक्ती गंगणे हिच्या यशाबद्दल जेष्ठ पत्रकार महेंद्र मस्के, पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे, रामकिशन कर्डीले, सिंदफाना पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

# खानापूर सरपंच, उपसरपंचाना पदच्यूत करण्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय

माजलगाव । प्रतिनिधी

खानापुरचे सरपंच पंडित बाजीराव आबुज आणि उपसरपंच सोजरबाई एकनाथ क्षीरसागर यांना पदावरून हटविण्याचा बीड जिल्हाधिकारी यांचा निर्णय अप्पर विभागीय आयुक्तांकडून देखील कायम ठेवण्यात आला आहे.अप्पर आयुक्तांनी स्थगिती अपिल फेटाळल्यानंतर २१ एप्रिल २०२६ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने जिल्हाधिकार्यांच्या निर्णयाला चार आठवड्यांची स्थगिती दिली होती. शिवाय हे प्रकरण अप्पर विभागीय आयुक्तांनी चार आठवड्यात निकाली काढावे, असे आदेश दिले होते. अखेर अप्पर विभागीय आयुक्तांनी तीनच आठवड्यात आदेश पारित केले आहेत.

नोव्हेंबर २०२३ मध्ये खानापूर ग्रामपंचायतीची निवडणूक झाली होती. निकालानंतर विकास खंडू कांबळे यांनी सरपंच पंडित आबुज आणि उपसरपंच सोजरबाई क्षीरसागर यांनी सरकारी जागेवर अतिक्रमण केल्याबाबत जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे तक्रार केली होती. मात्र तत्कालिन जिल्हाधिकारी आणि आता भूसंपादन घोटाळ्यात जेलमध्ये असलेले प्रमुख आरोपी अविनाश पाठक हे या प्रकरणात सुनावणीच घेत नव्हते. त्यामुळे न्याय मिळण्यास विलंब झाला. त्यानंतर विवेक जॉन्सन यांनी जिल्हाधिकारी पदाचा पदभार घेतल्यानंतर प्रकरणाला वेग आला. तक्रारदार कांबळे यांनी केलेल्या तक्रारीवरून माजलगाव पंचायत समितीच्या बीडीओंना पंचनामा करण्याचे आदेश दिले. त्यानुसार विस्तार अधिकारी यांनी खानापूर येथे जाऊन अतिक्रमीत जागेचा पंचनामा केला.शिवाय ग्रामपंचायतीच्या अभिलेखाची तपासणी केली. त्यात अतिक्रमण असल्याचे सिध्द झाले.शिवाय ग्रामपंचायतीच्या अभिलेखात व्हाईटनर लावून खाडाखोड केल्याचं देखील समोर आलं.तसा अहवाल जिल्हाधिकार्यांना देण्यात आला. त्यानंतर जिल्हाधिकार्यांनी सर्व पुरावे समोर ठेवत आबुज आणि क्षीरसागर यांना बचावाची संधी दिली.मात्र ते



### अप्पर विभागीय आयुक्तांकडूनही कायम

योग्य प्रकारे बचाव करू शकले नाहीत. त्यामुळे १८ फेब्रुवारी २०२६ रोजी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पंडित बाजीराव आबुज आणि सोजरबाई एकनाथ क्षीरसागर यांना पदावरून पदच्यूत करण्याचा निकाल दिला. त्यानंतर आबुज आणि क्षीरसागर यांनी निकालाविरोधात विभागीय आयुक्तांकडे स्थगिती मागीतली. मात्र त्यांचा स्थगिती अर्ज देखील फेटाळण्यात आला होता. त्यामुळे त्यांनी पुन्हा खंडपीठात धाव घेतली. न्यायमुर्ती चपळगावकर यांनी त्यांचा स्थगिती अर्ज मान्य करीत चार आठवड्यात विभागीय आयुक्तांनी निकाल द्यावा असे आदेश २१ एप्रिल रोजी पारित केले.पण चार आठवडे होण्यापुर्वीच अप्पर विभागीय आयुक्त खुशालसिंह परदेशी यांनी आबुज आणि क्षीरसागर यांचा अर्ज फेटाळात त्यांना पदावरून दूर केल्याबाबतचा जिल्हाधिकार्यांचा निर्णय कायम ठेवला.

अप्पर विभागीय आयुक्तांनी आदेशात काय म्हटले?

या प्रकरणातील उपलब्ध अभिलेख, ग्रामपंचायत नमुना क्र. ८, अतिक्रमण रजिस्टर, गटविकास अधिकारी व संबंधित अधिकार्यांचे चौकशी अहवाल तसेच जिल्हाधिकारी यांचा विवादित आदेश यांचे अवलोकन केले असता, मालमत्ता क्र. १७४ बाबत अभिलेखात फेरफार झाल्याची बाब नोंदीवरून दिसते. तसेच मालमत्ता क्र.२०८ ही उद्यानासाठी राखीव जागेशी संबंधित असल्याचे चौकशी अहवालात नमूद असल्याचे दिसून येते.अर्जदार सोजरबाई क्षीरसागर यांच्या मुलाच्या नावाने ग्रामपंचायतीच्या उद्यानासाठी राखीव जागेवर सुमारे ९०० चौ. फूट आर.सी.सी. बांधकाम असल्याची नोंद अतिक्रमण रजिस्टरमध्ये असल्याचे जिल्हाधिकारी यांनी विचारात घेतलेले आहे. ही नोंद केवळ तक्रारदाराच्या म्हणण्यावर आधारित नसून ग्रामपंचायत व शासकीय अभिलेखाशी संबंधित असल्याने ती पूर्णपणे दुर्लक्षित करता येत नाही- जिल्हाधिकारी, बीड यांनी उपलब्ध अभिलेख, चौकशी अहवाल, नमुना क्र. ८ व अतिक्रमण नोंदी विचार करून अपीलार्थीना अपात्र ठरविले आहे. सदर आदेशात नोंदविलेले निष्कर्ष हे अभिलेखात विसंगत किंवा पूर्णत: मनमानी असल्याचे अपीलार्थी (आबुज, क्षीरसागर) दाखवून देऊ शकलेले नाहीत. त्यामुळे प्रस्तुत अपीलातील जिल्हाधिकारी, बीड यांचा दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजीचा आदेश कायदेशीर व योग्य असल्याने आदेशात हस्तक्षेप किंवा फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. उपरोक्त निष्कर्षानुसार अपीलार्थी यांचा अपील फेटाळणे योग्य असल्याचे निष्कर्ष आलेले असल्याने मी अपर विभागीय आयुक्त, मला प्राप्त अधिकारानुसार आदेश पारित करीत आहे, असे आदेशात म्हटले आहे.

अॅड. शेकडे, अॅड. थावरे यांनी मांडली बाजू

याप्रकरणी खानापुरचे सरपंच व उपसरपंच यांच्या वतीने अॅड. सुदर्शन सोळंके आणि अॅड. महेंद्र गंडले यांनी बाजू मांडली.तर तक्रारदार कांबळे यांच्या वतीने अॅड. शेकडे आणि अॅड. थावरे यांनी भक्कमपणे बाजू मांडली. ज्यामुळे सरपंच आबुज आणि उपसरपंच क्षीरसागर यांना पदावरून दूर व्हावं लागलंय.

## गेवराईच्या रुद्रेश्वर मंदिरात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

गेवराई । प्रतिनिधी

समाजाच्या हिताचे तसेच सामाजिक, अध्यात्मिक आणि शैक्षणिक कार्यात रुद्रेश्वर सेवा मंडळाकडून नेहमीच स्तुत्य आणि सामाजिक उपक्रम राबविले जातात. सातत्याने चांगले काम या ठिकाणी होतेय यांचा मनस्वी आनंद आहे. तर मंडळाचे कार्य कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन जेष्ठ पत्रकार शिवाजी मामा ढाकणे यांनी केले.

गेवराई शहरातील रुद्रेश्वर सेवा मंडळाच्या वतीने जायकवाडी वसाहत येथील रुद्रेश्वर महादेव मंदिरात सोमवारी दहावी, बारावीसह गुणवंत विद्यार्थ्यांचा भेटवस्तू देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार समारंभ संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी नगरसेवक बाबूशेठ झंवर, पत्रकार सखाराम शिंदे, पत्रकार विनोद पौळ,



पत्रकार दत्ता लाड, कल्याण स्वामी, वैजिनाथ मिटकर, गणेश भुकेले, कल्याण स्वामी , सतीश रुकर, ड.घोडके सह आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना जेष्ठ पत्रकार ढाकणे म्हणाले की, प्रत्येकाने आपल्या वाट्याला आलेले कर्म इमाने इतबारे केले पाहिजे तीच खरी विष्णूची महापुजा आहे. विद्यार्थ्यांनी विद्यार्थी अवस्थेत अभ्यासात लक्ष दिले पाहिजे म्हणजे पुढील जीवन सुखी होते. सध्या तंत्रज्ञानाचे युग आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्याकडे जे स्कील आहे. त्यात सातत्य ठेवत यशस्वी होवून करिअर घडवले पाहिजे तर यावेळी समृद्धी गायकवाड, पायल बारगजे, ओम भुकेले, यश धापसे, विशाल घोरपडे, संचिता निवारे, आश्विन दहिवाळ, ऋषिकेश वाणी, मयूरी कोंढरे, शिवम फुलशंकर, पृथ्वीराज राहींज, ज्ञानेश्वरी पिसाळ, साक्षी पिसाळ, राम भुकेले, सृष्टी कानगुडे, ऋतुजा वाणी, नंदिनी राठोड, अर्पिता बेद्रे, गौरी पानखडे, पूनम गायकवाड, सिद्धी निवारे, स्वप्नील कोंढरे, शांभवी बोर्डे, आनवी डॉक्टर बाबू स्वामी या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शिक्षिका सारिका निवारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी रुद्रेश्वर सेवा मंडळातील माजी सैनिक कोंढरे, मंगल स्वामी, विलासराव वाणी, शिवाजीराव खंडागळे, माऊली रत्नपारखे, येवले, माजी ना. तहसीलदार रामदासी, बदामराव पानखडे, जीवनराव वराट, राजेंद्र निकम आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुद्रेश्वर सेवा मंडळाचे सदस्य गणेशराव भुकेले यांनी तर कल्याण स्वामी यांनी सर्वांचे आभार मानले.

## रुणसेवा ही बोलण्यात नसावी ही कृतीत असवी लागते

पाटोदा । प्रतिनिधी

मतदारसंघातील आरोग्यदुत म्हणून ओळखले जाणारे नेतृत्व आ सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून शिफारस मुळे रुग्णांसाठी अहोरात्र झटुन आपल्या मतदारसंघातील व बाहेरील लोकांसाठी रुग्णांसाठी विविध योजना मधुन लोकांसाठी मदतीला धावून जाणारे आ सुरेश आण्णा धस यांनी हातोला येथील रहिवासी असलेल्या एकनाथ दशरथ गर्जे पेशंट सह्याद्री हॉस्पिटल येरवडा पुणे येथे तीन दिवसापूर्वी ऍडमिट केलेले होते त्यांचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला डॉक्टरांनी चार लाख २७ हजार बिल केले होते सह्याद्री मॅनेजमेंट पेशंट नातेवाईक सांगितले पैसे भरा नंतर पेशंट घेऊन जा असे सांगितले असता मयत एकनाथ गर्जे यांचे पुतण्या विजय गर्जे व विकास गर्जे हे त्यांच्यासोबत होते त्यांनी फोन करून पोपट गर्जे यांना फोन करून हकीकत सांगितली व आ सुरेश आण्णा धस फोन करता का असे विचारले त्यांनी लगेच अण्णांना फोन लावला व विजय गर्जे यांना स्वतःच्या मोबाईलवरून अण्णांना फोन करायला सांगितला अण्णा मुंबईत असताना अण्णांनी दुसऱ्या मिनिटाला सह्याद्री हॉस्पिटलच्या डॉक्टरांना फोन करून सांगितले मयत पेशंटच्या नातेवाईका जवळ कसलाही पैसा नाही त्यांना सोडून द्या त्यांची परिस्थिती एकदम गरीब आहे त्यांच्याकडे जायलाही पैसे नाही आणि विजय गर्जे यांना सांगितले तुम्ही एक रुपयाही भरू नका तरीसुद्धा तरीसुद्धा डॉक्टर पेशंटच्या विजय गर्जे यांना काहीतरी पैसे भरावा लागतील असे सांगितले आम्हाला आमदार साहेबांनी सहकार्य करायला सांगितले तुम्हाला नेहमी पैसे तरी भरावे लागतील असं सांगितलं नंतर विजय गर्जे यांनी मला फोन केला मी अण्णांना परत ही हाकिकत सांगितले अण्णांनी एक क्षणाचाही विलंब न करता सह्याद्री हॉस्पिटलच्या असिस्टंट मॅनेजमेंट ला फोन पेशंट कडून एकही रुपया घेऊ नका त्यांच्याकडे पैसे नाहीयेत असे पुढील प्रोसेस चालू केली रात्री साडे आठ नऊ वाजता डेड बॉडी त्यांच्या ताब्यात दिली ससून हॉस्पिटल येथे पीएम करून रात्री त्यांच्यामुळे गावी हातोला येथे आणून दिनांक २० ५ २०२६ रोजी सकाळी साडेसात वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले त्यामुळे लोकनेते आ सुरेश आण्णा धस हे आरोग्य विभागचे कामं पाहणारे पिए विकास तात्या साळवे यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे आ सुरेश आण्णा धस सर्वसामान्य गोरगरिबांच्या रात्री अहो रात्री कधीही अडचणीला धावून येतात ही सर्वत्र चर्चा सुरू होती व गर्जे परिवाराने आम्हाला धस आणा नी आभाळाएवढी मदत केली व आमच्या मदतीला धावून आल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले

## नागपूर येथील राज्यस्तरीय उपवर्गीकरण चिंतन परिषदेस राजेश घोडे यांना विशेष निमंत्रण

माजलगांव । प्रतिनिधी

नागपूर येथील सिव्हिल लाईन्स परिसरातील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात दि.२४ मे रविवार रोजी सकाळी १०:०० वाजता राज्यस्तरीय उपवर्गीकरण चिंतन परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक, शैक्षणिक व आरक्षण विषयक विविध मुद्द्यांवर या परिषदेत सखोल चर्चा होणार असून राज्यभरातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

परिषदेचे उद्घाटन माजी सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांच्या हस्ते होणार आहे. या परिषदेस आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे यांना विशेष निमंत्रण देण्यात आले असून ते उपवर्गीकरण, सामाजिक न्याय आणि मागास घटकांच्या



हक्कांबाबत आपले विचार मांडणार आहेत. त्यामुळे परिषदेकडे राज्यभरातील सामाजिक संघटनांचे विशेष लक्ष लागले आहे.

या परिषदेत प्रा.सुकुमार कांबळे,प्रा.रामचंद्र भराडे,डॉ.अंकुश गोतावळे,प्रा. मुकेश दुपारे,डॉ. रवींद्र मुंद्रे,प्रा. किशोर बिरला,डॉ. पुरणचंद्र मेश्राम, प्रा.संदेश वाघ, रत्नसिंग बावरी, जयसिंग कुछवाह, नागेश मानकर, विशाल लारोकर, भय्या खैरकर तसेच लहु सेनेचे संयोजक संजय कठाळे आदी मान्यवर विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. उपवर्गीकरणाच्या संदर्भातील सामाजिक, शैक्षणिक आणि घटनात्मक पैलूंवर चिंतन करण्यासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. राज्यातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, अभ्यासक, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली. परिषदेला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सचिन मून,संजय कठाळे,प्रशांत शहारे,राजेश भास्कर,भय्या खैरकर आणि प्रा. विनोद बागडे यांनी केले आहे.

## शेतकऱ्याच्या शेतातून बेकायदेशीर रस्ता काढल्याचा आरोप

### प्रशासनाकडे तात्काळ कारवाईची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील सौताडा येथील शेतकरी अशोक विलास सानप यांनी त्यांच्या खासगी मालकीच्या शेतातून परवानगी व पूर्वसूचना न देता रस्ता काढण्यात आल्याचा आरोप करत संबंधित प्रशासनाकडे तक्रार दाखल केली आहे. याबाबत त्यांनी उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे.

तक्रारीनुसार, मौजे सौताडा येथील गट क्रमांक ३५९ मधील सुमारे २० आर जमीन त्यांच्या मालकीची असून संबंधित क्षेत्र सातबारा उताऱ्यावर त्यांच्या नावावर असल्याचे नमूद करण्यात आले आहे. असे असताना कोणतीही पूर्वकल्पना, परवानगी किंवा संमती न घेता ग्रामपंचायतीमार्फत मनरेगा अंतर्गत रस्ता काढण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

शेतकऱ्याचे म्हणणे आहे की, या कामामुळे त्यांच्या शेतीचे नुकसान झाले असून शेती क्षेत्रावर परिणाम झाला आहे. त्यांनी संबंधित काम तात्काळ थांबवून प्रकरणाची चौकशी करावी तसेच झालेल्या नुकसानीची दखल घ्यावी, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे. तसेच भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना कायद्यानुसार मालकाच्या संमतीशिवाय जमीन घेता येत नसल्याचा उल्लेखही निवेदनात करण्यात आला आहे. प्रशासनाने वस्तुस्थितीची पडताळणी करून योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

पान ६ वरुन...

### शहराच्या स्वच्छता व

सुधारणा, पाणीपुरवठा सक्षमीकरण, रेनवॉटर हार्वेस्टिंग आणि पाण्याच्या पुनर्वापरासाठी, तर उर्वरित ५० टक्के निधी प्रभावी घनकचरा व्यवस्थापन व स्वच्छता उपक्रमांसाठी वापरणे बंधनकारक आहे.

या निधीच्या माध्यमातून शहरातील जुन्या व गळती होणाऱ्या जलवाहिन्यांचे नूतनीकरण, नवीन जलवाहिन्यांची उभारणी, पाणी वितरण व्यवस्थेचे आधुनिकीकरण, पाणी साठवण व पुनर्वापर प्रकल्प, तसेच कचरा संकलनासाठी आधुनिक यंत्रसामग्री, कचरा विलगीकरण केंद्रांची उभारणी आणि स्वच्छता मोहिमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

''केंद्र शासनाच्या माध्यमातून मिळालेला हा निधी बीड शहराच्या मूलभूत नागरी सुविधांमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणणारा ठरेल. स्वच्छता आणि पाणीपुरवठा या दोन्ही महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये यामुळे मोठी सुधारणा होईल. प्रशासकीय कालावधीत प्रलंबित राहिलेला हा निधी आता एकत्रित प्राप्त झाल्याने शहराच्या विकासकामांना मोठी चालना मिळणार आहे. या निधीचा योग्य आणि पारदर्शक वापर होण्यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करणार आहोत. नागरिकांना अधिक दर्जेदार नागरी सुविधा देणे हेच आमचे उद्दिष्ट असल्याचेही फारूक पटेल व अमर नाईकवाडे यांनी सांगितले आहे.'' केंद्र शासनाच्या या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे बीड शहराच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळणार असून, ''स्वच्छ, सुंदर आणि सक्षम बीड'' या संकल्पनेच्या पूर्ततेकडे आणखी एक भक्कम पाऊल टाकले जाणार आहे.

### पाटोदा तालुक्यातील

आंदोलनाचा इशारादिव्यांगांचे होत असलेले हाल थांबवून त्यांचे थकीत मानधन तत्काळ खात्यावर जमा करावे, अशी मागणी प्रहार संघटनेने केली

पान ६ वरुन...

आहे. मानधन न मिळाल्यास सर्व दिव्यांग बांधव तहसील कार्यालयासमोर आंदोलन करतील आणि या दरम्यान होणाऱ्या सर्व परिणामांची जबाबदारी प्रशासनाची राहील, असा स्पष्ट इशारा पत्राद्वारे देण्यात आला आहे.या निवेदनाच्या प्रती आमदार बच्चू कडू, बीड जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकारी पाटोदा यांनाही पाठवण्यात आल्या आहेत. या निवेदनावर वसा नामदेव कदम, श्रीहरी खांडे, महादेव गणपती जाधव, कोंडीबा नाईकनवरे आणि पाटोदा तालुक्यातील इतर दिव्यांग बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### जायकवाडीच्या पाण्यासाठी

१४ हजार कोटी रुपयांचा प्रकल्प मंजूर केला आहे. बीड जिल्ह्यातील शेतीला पाणी नसल्याने मोठ्या प्रमाणावर शेतकरी आत्महत्या होत आहेत, तरुण बेरोजगार आहेत, ऊसतोड मजूर, महिलांचा प्रश्न आहे, हे प्रश्न शेतीला जायकवाडी धरणाचे हक्काचे पाणी मिळाल्यास सुटतील, शेती व शेतकऱ्यांचा विकास होईल, त्यामुळे शेतीला बारमाही पाणी द्या, अशी एकमुखी मागणी बंगाली पिंपळा येथे शेतकऱ्यांनी केली. या मागणीसाठी बीड येथे होणाऱ्या शेतकरी बैलगाडी मोर्चास मोठ्या संख्येने येण्याचा निर्धारही यावेळी शेतकऱ्यांनी व्यक्त केला. यावेळी लोकलढा आंदोलनचे समन्वयक, परिसरातील तरुण, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आष्टीत सोनसाखळी चोरांचा

करत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे पोलिस प्रशासनावरील लोकांचा विश्वास उडत चालल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी तातडीने आष्टी पोलीस स्टेशनला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घ्यावा, संबंधित कर्मचाऱ्यांना एसपींनी अधिकाराचा वापर करून जनतेला समाधान वाटेल असा निर्णय घ्यावा.अशी मागणी जनतेमधुन होत आहे.

पान ६ वरुन...

### महिला भाजी विक्रेती विरुध्द

करण्याचे निर्देश आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी दिले.

या बाबत दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, शहरातील अतिक्रमण निघाले पाहिजे, अतिक्रमण मुक्त रस्ते व्हावेत यासाठी नगर परिषद प्रशासन प्रयत्न करत आहे. अतिक्रमण काढताना कोणताही भेदभाव यंत्रणेतील कर्मचाऱ्यांनी करू नयेत अशा प्रकारच्या सूचनाही आपण त्यांना दिल्या आहेत. सध्या बीड शहरात अतिक्रमण विरोधी मोहिमेच्या अनुषंगाने अतिशय गलिच्छ राजकारण विरोधकांकडून होत असल्याचा आरोपही आ. पंडित यांनी केला. ग्रामीण भागातून भाजीपाला विक्रीसाठी येणाऱ्या भाजी विक्रेत्यांना वेगवेगळ्या ठिकाणी भाजीपाला विक्रीची सोय पालिकेने केली आहे. सेवादल मैदान भाजीमंडई, महात्मा फुले भाजीमंडई आणि खासबाग आडत मार्केट आदी ठिकाणी याबाबतची सुविधा उपलब्ध आहेत. वयोवृध्द महिला भाजीपाला विक्रेतीबद्दल सहानुभूती असून भविष्यात अशा गोर-गरीब भाजी विक्रेत्यांविरुध्द बेकायदेशीर कारवाई आपण खपवून घेणार नाहीत अशी ठोस भुमिका यानिमित्ताने आ. विजयसिंह पंडित यांनी मांडली. बीड नगर परिषदेतील सर्व पदाधिकारी सक्षमपणे काम करत असल्याचे त्यांनी या निमित्ताने सांगितले.

### बांधकामावरून पडून

मृत्यू झाल्याचे समजले. त्यानंतर सिरसाळा पोलिसांनी पंचनामा करून शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण केली. अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन झाल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. त्यानंतर अंकुश नगर, बीड येथील स्मशानभूमीत अमोल माने यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, या प्रकरणी सध्या तरी कोणावरही संशय अथवा तक्रार नसल्याचे निर्मला माने यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबात नमूद केले आहे.अकाली निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### अंबाजोगाईतही खासगी

शहरात १० आणि ११-१२ वर्गाच्या शिकवण्या घेणा-या या कोचिंग क्लासेस कडून मुलांना वैद्यकीय प्रवेशाचे अमिष दाखवून भरमसाठ फीस उकळुन नियमांचे सर्रास उल्लंघन करून हे कोचिंग क्लासेस भरवण्यात येतात. या क्लासेस मध्ये एका मोठ्या हॉल मध्ये हे सर्व विद्यार्थी एकत्र बसवून त्यांचे वर्ग घेण्यात येतात. शेकडो मुलांना एका हॉल मध्ये डांबुन शिकवणारे हे खाजगी कोचिंग क्लासेस वाले प्रशासनाला दिसत नाहीत का असा प्रश्न नागरीकांकडुन उपस्थित करण्यात येत आहे. ऐकमेकाचे विद्यार्थी ओढण्याकडे क्लासेवाल्यांचा कल दिसत आहे. पूर्वी क्लासेसच्या वेळा विद्याथ्र्यांच्या वेळेनुसार व ईतर विषयाच्या क्लासेसच्या वेळेचा विचार करुन खेळीमेळीच्या वातावरणात शिक्षण दिले जायचे. शहरात पुन्हा जोमाने खाजगी क्लासेस सुरु झाले आहेत.क्लासेस कधी बंद होतील, याचा भरोसा नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या फिससाठी पालकांना तगादा लावला जात आहे. हॉटस्पॉट ठरलेल्या शहरात खाजगी कोचींग क्लासेस स्वतः चालकांनी सुरू केली. आपसातल्या मतभेदामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

### रोहयो मंत्री भरत गोगावले

पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. संघटना अधिक बळकट करण्याबरोबरच पक्षाच्या विविध विषयांवर या बैठकीत चर्चा होणार आहे. दरम्यान, जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी आजी-माजी लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्निल गलधर आणि चंद्रकांत नवले यांनी केले आहे.

### शारदा हॉस्पिटलच्या आरोग्य

डॉ. धनश्री पंडित, डॉ. किरण जाधव, डॉ. निखिल गव्हाणे, डॉ. प्रफुल्ल पवार, डॉ संदीप ढेरे, डॉ.पल्लवी चव्हाण, डॉ. गजेंद्र लोंढे आदींनी रुग्णांची तपासणी करून उपचार केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य प्रकाश घाडगे, प्राचार्य राठोड व्हि.पी., प्रा. बबन काकडे समन्वयक तात्यासाहेब भोसले यांच्यासह नर्सिंग स्टाफ सौ विजया मालवे, फार्मसी आनंद भगत, शिवम पाटोळे, आयटी विभागाचे अनिरुद्ध भिलवडे, संदेश पघळ, निलेश काळे, सुमित बागल, सौ. मयुरी आकरे, कु. श्रद्धा वादे आदींनी परिश्रम घेतले. यावेळी पाचेगाव आणि पंचक्रोशीतील शेकडो रुग्ण, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मार्चमधील अवकाळी पावसामुळे झालेल्या पीक नुकसानभरपाईचा जीआर आला; अशी होणार वाटप

मुंबई : माहे मार्च-२०२६ या कालावधीत राज्यात विविध जिल्ह्यांत अवकाळी पाऊस यामुळे शेतीपिकांच्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना मदत देण्याकरिता निश्चित केलेल्या दरानुसार रुपये १६४,८३,४४,०००/- (रूपये एकशे चौसष्ट कोटी त्र्याऐंशी लक्ष चवेचाळीस हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

सूचित केल्यानुसार डीबीटी पोर्टलव्दारे लाभार्थ्यांना थेट त्यांच्या बँक खात्यात निधी वितरीत करण्यात यावा. सोबतच्या प्रपत्रामधील सर्व लाभार्थ्यांची माहिती विहित नमुन्यात काळजीपूर्वक तयार करुन संबंधित अधिकाऱ्यांनी ती संगणकीय प्रणालीवर भरुन मान्यतेबाबत नियमानुसार कार्यवाही करावी.

चालू हंगामामध्ये यापूर्वी शेतीपिकांच्या नुकसानीकरिता वितरीत करण्यात आलेल्या मदतीच्या निधीमध्ये या प्रस्तांवातर्गत मागणी करण्यात आलेल्या निधीचा समावेश नाही याची दक्षता घ्यावी. एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे



विहित दराने मदत देण्यात येत असल्याची खात्री करावी. कोणत्याही लाभार्थ्यांना मदत देतांना व्दिरुक्ती होणार नाही याची तहसिलदार यांनी व जिल्हाधिकारी कार्यालयाने कटाक्षाने काळजी घ्यावी. हा निधी खर्च करताना संदर्भाधीन सर्व शासन निर्णयातील सुचनांचे व निकषांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. ज्या प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी सदर निधी खर्च करण्यात यावा. ही मदत देताना नैसर्गिक आपत्तीकरिता विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता होत असल्याची खात्री सर्व संबंधितांनी करावी.

लाभार्थ्यांना मदत वाटपाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील जिल्ह्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा. या आदेशाव्दारे तसेच यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाव्दारे नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना दिलेला मदतीचा निधी बँकांनी कर्ज खात्यात अथवा अन्यथा वसुलीसाठी वळती करु नये.

याकरिता जिल्हाधिकारी यांनी सर्व बँकांना आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात. या सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

# जनावरांच्या लाळ्या खुरकुत रोगावर करा घरगुती उपचार


जनावरांमध्ये हिवाळ्यात लाळ्या-खुरकुत हा रोग मोठ्या प्रमाणात आढळून येतो. या रोगामुळे जनावरांच्या तोंडामध्ये व खुरांमध्ये जखमा होतात. त्यामुळे जनावरांना चारा खाता येत नाही. या रोगामुळे दुभत्या जनावरांच्या दुधामध्ये घट होते. जनावरे वेळेवर माजावर येत नाहीत, तसेच गाभण जनावरांमध्ये गर्भपाताची शक्यता निर्माण होते. त्यामुळे या आजाराचे नियंत्रण करणे महत्त्वाचे आहे. यासाठी काही घरगुती उपायही करता येऊ शकतात.

आवश्यक साहित्य/सामग्री :कुप्पी (हरित मंजरी) वनस्पतीची पाने १ मूठभर, लसणाच्या पाकळ्या १०, कडूनिंबाची पाने १ मूठभर, नारळाचे तेल किंवा तिळाचे तेल ५०० मि.ली., हळद पावडर २० ग्रॅम, मेहंदीची पाने १ मूठभर, तुळशीची पाने १ मूठभर, सीताफळाची पाने.

कृती :नारळाचे तेल किंवा तिळाचे तेल आणि सीताफळाची पाने सोडून इतर सर्व सामग्री एकत्र बारीक वाटून घ्यावी. यामध्ये नारळाचे किंवा तिळाचे तेल टाकून चांगले उकळावे आणि थंड करावे.

याचा वापर कसा करावा?

सर्वात आधी जखमा स्वच्छ कराव्यात. त्यानंतर हे मिश्रण जखमेवर लावावे. जखमेत किडे असतील तर



पहिल्या दिवशी नारळाच्या तेलात कापूर मिसळून जखमेवर लावावे किंवा सीताफळाच्या पानांची पेस्ट करून जखमेवर लावावी. याबरोबर रोगाची तीव्रता जास्त असल्यास पशुवैद्यकाच्या सल्ल्याने उपचार करावेत.

लसीकरण महत्त्वाचे : लाळ्या-खुरकुत या रोगापासून जनावरांचे रक्षण करण्यासाठी लसीकरण गरजेचे आहे. रोग झाल्यानंतर उपचार करण्यापेक्षा रोग होऊ नये यासाठी लसीकरण करणे महत्त्वाचे आहे. लसीकरण केल्यानंतर १५ दिवसानंतर रोगाविरूद्ध प्रतिकार शक्ती तयार होण्यास सुरुवात होते. लसीकरण केल्यानंतर सहा महिन्यापर्यंत जनावरांची या रोगाविरुद्ध प्रतिकारशक्ती टिकून राहते. त्यामुळे वर्षातून दोनदा जनावरांचा या रोगाचे लसीकरण करावे.

# करपा नियंत्रणासह द्राक्षास पाण्याच्या ताणाचे नियोजन

भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मॉन्सून १७ मे रोजी अंदमान-निकोबार बेटांपर्यंत पोहोचला आहे. महाराष्ट्रात मॉन्सून साधारणपणे ५ जूनपर्यंत दाखल होण्याची शक्यता असून, १० ते १५ जूनपर्यंत तो संपूर्ण द्राक्ष पट्ट्यात सक्रिय होईल, असे चित्र दिसत आहे. उपग्रह चित्रांचा आढावा घेतल्यास केरळ, कर्नाटकाचा बहुतांश भाग तसेच महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा आणि सांगली या भागांत मोठ्या प्रमाणात बाष्पयुक्त आणि ढगाळ वातावरण तयार झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत, म्हणजेच २१ ते २४ मे दरम्यान या भागात मॉन्सूनपूर्व पाऊस होण्याची शक्यता आहे.

ज्या भागात पाऊस होईल, तेथे तापमानात काही प्रमाणात घट होईल. मात्र सापेक्ष आर्द्रता वाढल्यामुळे वातावरण अधिक दमट जाणवू शकते. आठवड्याच्या शेवटपर्यंत पुढील पावसाची शक्यता कमी असली, तरी दमट वातावरण कायम राहण्याची शक्यता आहे. सापेक्ष आर्द्रता वाढलेल्या परिस्थितीत वाढत्या कोवळ्या फुटींवर करपा रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे रोगाचा प्रादुर्भाव होण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक फवारणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी



कार्बेन्डाझिम १ ग्रॅम अधिक मॅन्कोझेब २ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. कार्बेन्डाझिमऐवजी थायोफिनेट मिथील याचाहीवापर करता येईल. कार्बेन्डाझिम आणि थायोफिनेट मिथील ही दोन्ही बुरशीनाशके बेन्झिमिडाझोल गटातील आहेत. ही बुरशीनाशके पाण्यात मिसळल्यानंतर त्यामध्ये तयार होणारे मेथाइल बेन्झिमिडाझोल कार्बामेट हे रसायन काही प्रमाणात सायटोकायनिन सारखे कार्य करते. द्राक्ष काडीमध्ये घड निर्मिती सुरू असताना सायटोकायनिनची वाढ होणे आणि जिबरेलिक ॲसिडचे (जीए) प्रमाण तुलनेने कमी राहणे हे फायदेशीर ठरते. त्यामुळे या टप्प्यावर या बुरशीनाशकांचा वापर रोग नियंत्रणाबरोबरच घड निर्मितीच्या दृष्टीनेही उपयुक्त ठरू शकतो. तसेच मॅन्कोझेब हे बुरशीनाशक करपा रोग नियंत्रित करण्याबरोबरच काही प्रमाणात जिवाणूजन्य करपा कमी करण्यासही मदत करू शकते.

घड निर्मितीसाठी योग्य वेळी पाण्याचा ताण महत्त्वाचा

खरड छाटणीनंतर साधारणपणे ४५ ते ६५ दिवसांच्या वाढत्या काडीवर किमान १ ते २ दिवस हलका पाण्याचा ताण देणे आवश्यक असते. यामुळे काडीमध्ये सूक्ष्म घड तयार होण्यास मदत होते. सध्या अनेक बागांमध्ये सबकेन तयार करण्यासाठी एक किंवा दोन पिंचिंग झालेली असू शकते. उष्ण वातावरणात पिंचिंगनंतर नवीन फुटी लवकर येण्यासाठी बागेला पाणी दिले जाते. मात्र, अशा वेळी पाणी दिल्यानंतर पाऊस झाल्यास जमिनीत वाफसा येण्यास पाण्याचा ताण देण्यास उशीर होऊ शकतो.

द्राक्ष काडीमध्ये घड निर्मिती सुरू असताना सायटोकायनिनची वाढ होणे आणि जिबरेलिक ॲसिडचे (जीए) प्रमाण तुलनेने कमी राहणे हे फायदेशीर ठरते. त्यामुळे या टप्प्यावर या बुरशीनाशकांचा वापर रोग नियंत्रणाबरोबरच घड निर्मितीच्या दृष्टीनेही उपयुक्त ठरू शकतो. तसेच मॅन्कोझेब हे बुरशीनाशक करपा रोग नियंत्रित करण्याबरोबरच काही प्रमाणात जिवाणूजन्य करपा कमी करण्यासही मदत करू शकते.

# रुफ टॉप वॉटर हार्वेस्टिंग : प्रणाली व्यवस्थापन आणि देखभाल

शहरीकरण आणि त्यातील पूर ही काही नवीन संकल्पना नाही. महाराष्ट्रामध्ये सन २००५ मध्ये आलेला पूर, चेन्नई मध्ये २०१५, पुणे व बेंगलोर मध्ये २०१९ ला असे अनेक पुर मोठ्या शहरांमध्ये दिसून येत आहेत. याला कारणीभूत म्हणजे वाढत्या शहरीकरणाबरोबर त्यातील ड्रेनेजची असलेली असुविधा आणि अयोग्य पाणी व्यवस्थापन. पाऊस पडल्यानंतर पाण्याला वाहून जाण्यासाठी वाट योग्य नसेल तर ते रस्त्यावर येऊन साठायला लागतो. हळूहळू मग तो मोठ्या पुराचे रूप धारण करते. नाल्यामध्ये कचरा अडकला तर ते ब्लॉक होते आणि पाण्याला वाहण्यासाठी मार्ग मिळत नाही मग ते रस्त्यावर येऊन साठते. पावसाचे पाणी असो अथवा रोजच्या वापरातील पाणी असो त्याला एकाच ठिकाणी सोडले जाते ते म्हणजे गटर किंवा ड्रेनेज लाईन. गटारीच्या क्षमतेपेक्षा जास्त पाणी झाल्यानंतर नाला तोडून ते पाणी सपाटभू भागावर व रस्त्यावर येते आणि पसरते. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो, तसेच रस्ते खराब होतात. पुरामुळे नुसते रस्ते खराब होत नाही तर डेंग्यू चिकनगुनिया, थंडी ताप व मलेरिया या सारखे विविध साथीचे आजार सुद्धा पसरतात. ही अवस्था शहराकडील तर काही गावे पाण्यापासून वंचित आहेत पाण्याची असलेल्या कमतरतेमुळे दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होऊ लागला आहे. याला पाण्याचे असलेले अव्यवस्थापन हे तितकेच कारणीभूत आहे. या सर्वांना आळा घालण्यासाठी एक लक्षवेधी उपाय म्हणजे रेन वॉटर हार्वेस्टिंग. या तंत्रज्ञानामुळे आपल्याला पावसाच्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन करता येते. पावसाचे पाणी वेगवेगळ्या पद्धतीने मार्गाने साठवता येते. अशाच काही पद्धती खालील प्रमाणे,

छतावरील पाणी साठवणूक पद्धत :या मध्ये छतावर पडणाऱ्या पाण्याला एकत्र करून जमिनीमध्ये भूजल पुनर्भरणासाठी सोडता येते किंवा स्टोरेज टाकीमध्ये साठवून ते पुढील काळासाठी वापरता येऊ शकते. पावसाचे पाणी पुनर्भरण किंवा पुनर्वापर खालील पद्धतीद्वारे करता येते. पावसाच्या पाण्याचे पुनर्भरणी करून भूजल पातळी वाढविण्यात येते तसेच वाहणाऱ्या पाण्याचे नियंत्रण सुद्धा करता येते. शहरी भागात इमारतीचे प्रमाण जास्त असते व छतांना पडणारे पावसाचे पाणी नियोजना अभावी मोठ्या प्रमाणात वाहून जाते त्यामुळे छतावरील



पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे छतावरील पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजनाद्वारे पुढील गोष्टी साध्य करता येतात. त्यामध्ये प्रामुख्याने, भूजलाचा स्थर नियंत्रित करता येते. शहरात येणाऱ्या पुराच्या पाण्याची तीव्रता व वारंवारिता कमी करण्यासाठी मदत होते. दुष्काळात पाण्याची उपलब्धता होण्यास मदत होते. भूजलातील पाण्याची पातळी व गुणवत्ता सुधारता येते. जल प्रदूषण रोखण्यास मदत होते. पाण्याची होत असलेली कमी पूर्ण करता येते. पावसाळ्यात गटार व नाले ब्लॉक होऊन पूर येऊ नये याकरिता.

पुनर्वापर संकलन टाकी छत : घराचे छत हे वेगवेगळ्या प्रकारचे असते. त्यामध्ये प्रामुख्याने जीआय, , सिमेंट पत्रे, कौलारू तसेच मातीचे छत इत्यादींचा समावेश असतो. छतासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्यानुसार छतावरील पाण्याची उपलब्धता कमी जास्त होते. छतावरील पावसाच्या पाण्याचे संकलन करण्याकरता छत बिनविषारी पदार्थापासून बनविलेले असावे. त्याला वॉटरप्रूफिंग केलेले असावे.

गटर आणि प्रथम फ्लश डिव्हाइस : याचा वापर छतावरील पाणी साठवून खाली स्टोरेज टाकी पर्यंत खाली जाण्याचा पाईपने नेण्यासाठी करतात. ह्याला छता च्या काठावर सौम्य उतार देऊन बसवले जाते, जेणेकरून पाणी विना अडथळ्यांनी स्टोरेज टाकीपर्यंत जाईल. यासाठी - पाईप, किंवा बांबूचा वापर करतात. डाऊन पाईपचा व्यास कमीत कमी १०० मीमी आणि २० मेश ची जाळी असावी कारण झाडाची पाने किंवा लहान खड्डे आत जाऊन ब्लॉक होणार नाहीत. गटारची व्यास आणि रुंदी : १५ ७९७:२००८ च्या दिलेल्या निर्देशकावरून घ्यावा किंवा मानक सूत्रांवरून काढावा. हे उपक्रम हे सुनिश्चित करते की प्रथम पावसाचे आधी छतावर किंवा गटारीमध्ये कचरा किंवा धूळ जमा झाले असेल तर प्रथम पावसानंतर ते पावसाच्या पाण्यात मिसळून पाणी साठवून प्रणालीमध्ये जाऊ नये. म्हणून पहिले एक ते दोन पाऊस सर्व पाणी फ्लश करून हे डिवाइस बंद करतात जेणेकरून पुढील स्वच्छ पाणी साठवण टाकीमध्ये साठवता येते.

संकलन/साठवण टाकी : ही जमिनीवर किंवा जमिनीच्या खाली बांधली जाते. जमिनीखालील टाकी ही दगडांची किंवा ला वॉटरप्रूफिंग चे अच्छादन करून बांधतात. तर जमिनीवरील टाकी ही उचललेल्या प्लॅटफॉर्म वरती ठेवतात. जमिनीखाली बांधलेली टाकी ही कमीत कमी ३० जमिनीच्या वर असावी.

पुनर्भरण खड्डा : पुनर्भरण खड्ड्याच्या संरचनेच्या घटका मध्ये गटार, प्रथम फ्लश डिव्हाइस आणि पुनर्भरण खड्डा हे घटक असतात. यामधील प्रथम तीन घटकांचा अभ्यास आपण वरील पुनर्वापर संकलन टाकी या संरचनेमध्ये पाहिला आहे. उर्वरित पुनर्भरण खड्याबद्दल माहिती खालील प्रमाणे पाहू. पुनर्भरण खड्ड्याचा आकार लांबी रुंदी उंची ही ३ बाय ३ बाय ३ घनमीटर मध्ये असावी. फिल्टर सामग्री मध्ये ०.६ मीटर, ०.५ मीटर, ०.४ मीटर मध्ये विभागणी करून मोठे दगड (५-१० सेमी) सर्वात खाली, खडी (५-१० मीमी) मध्यभागी आणि वाळू (१.५-२ मीमी) सर्वात वरती अनुक्रमे असावी. १.५ मीटरचा फ्री बोर्ड असावा. ( दिशादर्शक हरियाणा सरकार, २०२३). परंतु महाराष्ट्र सरकारच्या दिशादर्शकाच्या पद्धतीने पुनर्भर खड्ड्याचे लांबी व रुंदी ही एक ते दोन मीटर मध्ये तर उंची ही दोन ते तीन मीटर मध्ये असावे. तसेच मोठे दगड, खडकी आणि वाळू यांचे प्रमाण ५०%, २०%, १५% अशा अनुक्रमे असावे आणि फ्री बोर्ड पाच टक्के असावा. अशा प्रकारे जर दोन मीटरची उंची असेल तर त्यातील १.२ मीटर, ०.४ मीटर, ०.३ मीटर, ०.१ मीटर हे मोठे दगड, खडकी, वाळू आणि फ्री बोर्ड असेल.

व्यवस्थापन आणि देखभाल : मॉन्सून सुरू होण्याआधी आणि उन्हाळा संपायच्या आधी स्टोरेज टाकी घासून फ्लॅश करून घ्यावी सर्व गाळ आणि खड्डे काढून टाकावे टाकीमध्ये काही सेंटीमीटर स्वच्छ पाणी भरून ठेवावे. मान्सूनच्या आधी छतावरील टाइल्स किंवा शेवाळ साफ करावे. पहिला पाऊस पडल्यानंतर १५ ते २० मिनिट थांबावे व नंतर सर्व पाणी फ्लश करावे. फिल्टर मीडियाला पावसाळा सुरू होण्याआधी धुऊन घ्यावे त्यावेळी फिल्टर मीडियाला नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. पावसाळ्यामध्ये रुफ टॉप वॉटर हार्वेस्टिंग प्रणाली पाऊस सुरू होण्याच्या आधी १ ते २ पाऊस झाल्यानंतर रूप स्टॉप वॉटर हार्वेस्टिंग प्रणाली तपासून पहावी आणि कोरडा कालावधी जर पावसाळ्यामध्ये एक महिन्यापेक्षा जास्त झाला तर सर्व प्रणाली स्वच्छ धुऊन घ्यावी. इनलेट आणि आउटलेट ची सफाई करावी. लोखंडाच्या जाळीला साफ करावे पाणी किंवा इतर कचरा अडकला असेल तर तो काढून टाकावा. किडे-मकोडे किंवा मच्छर या त्रासापासून वाचण्यासाठी गैर पावसात इनलेट व आउटलेटला नायलॉन जाळीने किंवा कपड्याने बंद करावे. प्रत्येक तीन वर्षांनी एअर कॉम्प्रेसर ने इंजेक्शन वेल साफ करावी व त्याचा व्यास वाढवावा (कुपनलिकांसाठी).




## महत्वाच्या घटना

१३७७ : पोप ग्रेगोरी अकराव्याने पाच पोपचे फतवे काढून इंग्लिश तत्त्वज्ञानी जॉन वायक्लिफची मते खोडून काढण्याचा प्रयत्न केला.
१७६२ : स्वीडन आणि प्रशियामधे हॅम्बुर्गचा तह झाला.
१९०६ : अथेन्समध्ये तिसरे ऑलिंपिक खेळ सुरु. काही काळानंतर यांची अधिकृत खेळ म्हणून मान्याता काढून घेण्यात आली.
१९०६ : राइट बंधूंना त्यांच्या उडणाऱ्या यंत्रासाठी पेटंट देण्यात आला.
१९१५ : स्कॉटलंडच्या ग्रेटना ग्रीन गावात ३ रेल्वेगाड्यांची टक्कर होऊन २२७ जण ठार आणि २४६ जण जखमी झाले.
१९१५ : प्रथम विश्व युद्धादरम्यान सोवियत राष्ट्र इटलीने मित्र राष्ट्र ऑस्ट्रिया, हंगेरी आणि जर्मनी विरुद्ध युद्ध पुकारले.
१९२७ : चीनच्या झिनिंग जवळ झालेल्या ८.३ तीव्रतेच्या भूकंपात २,००,००० लोक ठार झाले.
१९४२ : दुसरे महायुद्ध मेक्सिकोने दोस्त राष्ट्रांच्या बाजूने युद्धात उडी घेतली.
१९६० : ग्रेट चिलीयन भूकंप हा ९.५ तीव्रतेचा जगातील सर्वात शक्तिशाली भूकंप आहे.
१९६१ : हुंडाबंदी विधेयकाला राष्ट्रपतींची संमती मिळून हुंडाबंदी कायदा अस्तित्त्वात आला.
१९७२ : सिलोनने नवीन राज्यघटना स्वीकारुन ते प्रजासत्ताक बनले. त्या देशाचे श्रीलंका असे नामकरण झाले आणि त्याने राष्ट्रकुल देशांत प्रवेश केला.
१९८७ : मेरठ जिल्ह्यात हाशिमपूरा हत्याकांड झाले.
१९८९ : अग्नी' या मध्यम पल्ल्याच्या क्षेपणास्त्राचे ओरिसातील मंडीपूर येथून यशस्वीरीत्या प्रक्षेपण करण्यात आले.
२००४ : भारताचे पंतप्रधान म्हणून मनमोहन सिंग यांचा शपथविधी.
२००९ : भारताचे पंतप्रधान म्हणून मनमोहन सिंग यांचा दुसऱ्यांदा शपथविधी.
२०१५ : आयर्लंड देश सार्वजानिक जनमतदानंतर समलिंगी विवाहाला कायदेशीर ठरवण्यासाठी जगातील पहिला देश बनला.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४०८ : हिंदू संत अन्नामचार्य यांचा जन्म. (मृत्यू: ४ एप्रिल १५०३)
१६८८ : अलेक्झांडर पोप, इंग्लिश कवी.
१७७२ : सतीची चाल कायदेशीरपणे बंद करणारे व अनेक भाषांतून प्रावीण्य मिळविलेले थोर समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांचा बंगालमध्ये जन्म झाला.
१७८३ : विद्युत चुंबक आणि विद्युत मोटर चे शोधक विल्यम स्टर्जन यांचा जन्म. (मृत्यू: ४ डिसेंबर १८५०)
१८१३ : जर्मन संगीतकार, संगीतसंयोजक व दिग्दर्शक रिचर्ड वॅग्नर यांचा जन्म. (मृत्यू: १३ फेब्रुवारी १८८३)
१८५९ : स्कॉटिश डॉक्टर व शेरलॉक होम्स या गुप्तहेरकथांचे लेखक सर आर्थर कॉनन डॉइल यांचा जन्म. (मृत्यू: ७ जुलै १९३०)
१८७१ : संस्कृत विद्वान, भाषांतरकार व शास्त्रसुधारक विष्णू वामन बापट यांचा जन्म. (मृत्यू: २० डिसेंबर १९३३)
१९०५ : इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शकाचे सहसंशोधक बोडो वॉन बोररी यांचा जन्म. (मृत्यू: १७ जुलै १९५६)
१९०७ : ब्रिटिश अभिनेता, दिग्दर्शक व निर्माता सर लॉरेन्स ऑलिव्हिये यांचा जन्म. (मृत्यू: ११ जुलै १९८९)
१९२५ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय कवी, व रशियन भाषेचे हिंदीत भाष्यांतर करणारे भारतीय भाष्यकार मदन लाल मधु यांचा जन्मदिन.
१९४० : इरापल्ली प्रसन्ना, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९४८ : भारतीय अभिनेता आणि पटकथालेखक नेदुमुदी वेणू यांचा जन्म.
१९५९ : भारतीय राजकारणी मेहबूबा मुफ्ती यांचा जन्म.
१९८४ : फेसबुकचे सह-संस्थापक डस्टिन मॉस्कोविट्झ यांचा जन्म.
१९८७ : सर्बियाचा टेनिस खेळाडू नोव्हान जोकोव्हिच यांचा जन्म.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५४५ : **भारतीय शासक शेरशाह सूरी यांचे निधन.**
१८०२ : **अमेरिकेची पहिली फर्स्ट लेडी मार्था वॉशिंग्टन यांचे निधन. (जन्म: २ जून १७३१)**
१८८५ : **जागतिक कीर्तीचे फ्रेन्च कादंबईकार, कवी आणि लेखक व्हिक्टर ह्यूगो यांचे निधन. (जन्म: २६ फेब्रुवारी १८०२)**
१९९१ : **भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक व कामगार पुढारी कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे यांचे निधन. (जन्म: १० ऑक्टोबर १८९९)**
१९९५ : **चित्रकार व शिल्पकार रविंद्र बाबुराव मेस्त्री यांचे निधन.**
१९९८: **लेखक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १९२८)**
२००३ : **डॉ. नित्यनाथ ऊर्फ नीतू मांडके भारतीय हृदयरोगतज्ञ.**
२०११ : **वैदिक व बौद्ध काळातील सुप्रसिद्ध भारतीय इतिहासकार तसचं, अलाहाबाद विद्यापीठातील प्राचीन इतिहासाचे प्राध्यापक व कुलगुरू गोविंदचंद्र पांडे यांचे निधन.**



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे निर्देश

जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यातील महसूल विभागाच्या कामकाजाला गती देण्यासाठी तसेच विविध प्रलंबित प्रकरणांचा वेळेत निपटारा करण्याच्या दृष्टीने आज तहसील कार्यालय, भोकरदन व उपविभागीय अधिकारी कार्यालय, भोकरदन येथे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली आज आढावा बैठक पार पडली. बैठकीत महसूल, निवडणूक, गृहनिर्माण व ग्रामविकासाशी संबंधित विविध योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी भोकरदन तालुक्यात सुरू असलेल्या जनगणना प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला. जनगणना काम अचूक व वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. तसेच 'सर्वांसाठी घरे' या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना घरे उपलब्ध करून देण्याच्या प्रक्रियेबाबतही चर्चा करण्यात आली.



बैठकीत विशेष सखोल पुर्नरिक्षण कार्यक्रम अंतर्गत निवडणूक विषयक कामकाजाचा आढावा घेण्यात आला. मतदार यादी अद्ययावत करणे, पात्र मतदारांची नोंदणी व त्रुटी दूर करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना दक्ष राहण्याचे निर्देश देण्यात आले.

शासकीय जमिनींवरील अतिक्रमण हटविणे आणि सिलींग जमिनींसंदर्भातील प्रकरणांचाही सविस्तर आढावा घेण्यात आला. शासकीय जमिनी अतिक्रमणमुक्त करण्यासाठी प्रभावी कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. तसेच प्रलंबित सिलींग प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यावर भर देण्याचे निर्देश दिले. मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांची प्रगतीही बैठकीत तपासण्यात आली.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सुलभ दळणवळणासाठी पाणंद रस्त्यांची कामे गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच उपविभगीय अधिकारी कार्यालय भोकरदन येथे भुसंपादन संबंधीत कामकाजाचा एकत्रीत आढावा घेऊन संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांना सदर कामे वेळेत पुर्ण करणे बाबत निर्देश दिले.

बैठकीदरम्यान विविध विभागांच्या प्रलंबित कामकाजाचा आढावा घेत जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. प्रशासनातील समन्वय वाढवून नागरिकांच्या समस्या तात्काळ सोडविण्याचे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी शासकीय धान्य गोदामास प्रत्यक्ष भेट देवून येथील धान्याच्या गुणवत्तेची पाहणी केली. यावेळी बैठकीस सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बी.बी. सरवनन (भा.प्र.से.), भोकरदन तहसीलदार ज्ञानेश्वर काकडे, जाफ्राबाद तहसीलदार अविनाश लोंढे, गट विकास अधिकारी भोकरदन ,नायब तहसिलदार, मुख्याधिकारी, यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## आ. राजेश राठोड यांच्या नेतृत्वाखाली बंजारा शिष्टमंडळाने घेतली राज्यपालांची भेट



मंठा। प्रतिनिधी

महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. जिष्णू देव वर्मा यांचे समवेत लोकभवन (राज्यभवन) येथे आ. राजेश राठोड यांच्या नेतृत्वाखाली बंजारा समाजाच्या शिष्टमंडळाची बैठक पार पडली, या प्रसंगी बंजारा पारंपरिक पद्धतीने त्यांचे स्वागत करण्यात आले आणि बंजारा समाजाचे विविध मागण्यांचे निवेदन राज्यपाल महोदयांना देण्यात आले. बंजारा समाजाचा समावेश आदिवासी संवर्गात करण्यात यावा, धनगर समाजा प्रमाणे आदिवासी संवर्गाच्या सर्व योजना बंजारा समाजाला लागू करण्यात याव्या, सर्वसाधारण संवर्गात मागासवर्गीयांनी अर्ज करू नये हा निर्णय रद्द करून सर्वसाधारण संवर्गात सर्वांना अर्ज करण्याची संधी पुर्ववत उपलब्ध करावी, बंजारा तांड्यावरच्या शाळा बंद करू नये आधी मागण्यांचा समावेश आहे.याप्रसंगी बंजारा समाजाचे पदाधिकारी राजु नाईक, अमरसिंह तीलावत, प्रकाश चव्हाण, राधेश्याम आढे, सुभाष तंवर, रामराव महाराज भाटेगावकर, सुरेश पवार, सतिश जाधव, राजेश चव्हाण, सुनील राठोड, प्रशांत नारनवरे, श्रीमती अर्चना गायकवाड यांची उपस्थिती होती.

## जायकवाडीच्या पाण्यासाठी बैलगाडीतून मिरवणुका

### बंगाली पिंपळा येथील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त, ऊसतोड मजूर व कंगाल झालेल्या शेतकर्यांचा विकास जायकवाडी धरणाचे पाणी शेतीला मिळाल्याने होईल, बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागातील शेतीला जायकवाडी धरणाचे पाणी देण्याची मागणी बंगाली पिंपळा येथे शेतकऱ्यांनी केली. यासाठी बैलगाडीसह गावातून मिरवणूक काढत शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागातील शेतीला जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे, गोदावरी-सिदफणा नदीजोड प्रकल्प गतीने करावा, श्री क्षेत्र भगवान गड ते मादळमोही-मजलगावपर्येंत उपकालवा करावा, १६८ टीएमसी पाण्यात बीड जिल्ह्यातील शेतीला हक्काचे पाणी मिळावे यासह इतर मागण्यांसाठी लोकलढा आंदोलनाच्या वतीने २९ मे रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बैलगाडी मोर्चा काढण्यात येणार आहे. या संदर्भात शेतकऱ्यांना माहिती देण्यासाठी गेवराई तालुक्यातील बंगाली पिंपळा येथे लोकलढा आंदोलनाची बैठक झाली. या बैठकीपूर्वी बंगाली पिंपळा गावामध्ये सर्व शेतकरी, तरुणांनी एकत्र येत गावातून वाजत-गाजत बैलगाडीसह मिरवणूक काढली. बंगाली पिंपळा व परिसरात शेतीला बारमाही पाणी नसल्याने सातत्याने शेती तोट्यात जाते, हीच परिस्थिती जिल्ह्यातील अनेक ठिकाणी आहे. श्री क्षेत्र भगवान गड, मातोरी, कोळगाव, मादळमोही, सिरसमार्ग, पाडळसिंगी, पाचेगाव ते तालखेडपर्येंतच्या शेतीला जायकवाडी धरणाचे पाणी मिळणे गरजेचे आहे, गोदावरी-सिंदफणा नदीजोड प्रकल्प गतीने राबवावा व कोकणचे पाणी गोदावरी खोर्यात येणार आहे, त्यात बीड जिल्ह्यातील शेतीला किती पाणी मिळेल हे सांगावे यासाठी लोकलढा आंदोलनच्या वतीने सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. विदर्भात ९४ हजार कोटी रुपयांचा नदीजोड प्रकल्प होत आहे तर दोन दिवसांपूर्वीच नाशिक, जळगाव व धुळे जिल्ह्यासाठी १४ हजार कोटी रुपयांचा प्रकल्प मंजूर केला आहे. बीड जिल्ह्यातील शेतीला पाणी नसल्याने मोठ्या प्रमाणावर शेतकरी आत्महत्या होत आहेत, तरुण बेरोजगार आहेत, ऊसतोड मजूर, महिलांचा प्रश्न आहे, हे प्रश्न शेतीला जायकवाडी धरणाचे हक्काचे पाणी मिळाल्यास सुटतील, शेती व शेतकऱ्यांचा विकास होईल, त्यामुळे शेतीला बारमाही पाणी द्या, अशी एकमुखी मागणी बंगाली पिंपळा येथे शेतकऱ्यांनी केली. या मागणीसाठी बीड येथे होणाऱ्या शेतकरी बैलगाडी मोर्चास मोठ्या संख्येने येण्याचा निर्धारही यावेळी शेतकऱ्यांनी व्यक्त केला. यावेळी लोकलढा आंदोलनचे समन्वयक, परिसरातील तरुण, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माहेश्वरी महिला संघटन आणि सखी सहेली तर्फे २७५ लेकींचा धोंडा

जालना। प्रतिनिधी

पुरुषोत्तम अधिक मासानिमित्त जालना जिल्हा माहेश्वरी महिला संघटन आणि सखी सहेली माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने ''धोंडा के रंग, बाईसा के संग'' हा भव्य दिव्य आणि आनंदमयी स्नेहसंमेलन कार्यक्रम महेश भवन येथे उत्साहात संपन्न झाला. माहेश्वरी समाजातील २७५ लेकींना वाण, आहेर भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. सकाळी मंडळाच्या वतीने सिव्हील क्लब येथून महेश भवन पर्यंत नाम संकीर्तन , वाजत -गाजत शोभायात्रा काढण्यात आली तद्नंतर जल्लोषात लेकींचे स्वागत झाले. छत्रपती संभाजीनगर येथील सामाजिक कार्यकर्त्या रेखा राठी, ज्योतिष्य भास्कराचार्य अनुसया मालू (जयसिंगपूर), यांची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती .



महिला संघटनच्या जिल्हाध्यक्ष नूतन दाड ,सखी सहेली महिला मंडळाच्या अध्यक्षा भारती मानधनी यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले.रेखा राठी यांनी माहेरवास शब्दार्थ विशद केला. अनुसया मालू यांनी अधिक मासाचे वैज्ञानिक महत्त्व विषद करून एका छताखाली सर्वांना भेटण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानले.यावेळी महिलांसाठी मनोरंजनात्मक खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. सूत्रसंचालन मीनाक्षी दाड व नीतू भक्कड यांनी केले. कार्यक्रमास माहेश्वरी महासभेचे जिल्हाध्यक्ष दामोदर बजाज ,जिल्हा सचिव दिलीप चेचाणी , शहराध्यक्ष विजय गोराठी, शहर सचिव उमेश बजाज, युवक अध्यक्ष धनंजय झंवर, संजय दाड ,विजय राठी ,रामनिवास मानधना ,कांतीलाल राठी ,निखिल चेचानी ,जगदीश राठी, कैलास लोया , राजेंद्र जेथलिया,नितीन काबरा, नितीन तोतला ,द्वारकादास सोनी, रामप्रसाद दाड ,विजय दाड, राजेश लड्डा ,अनिल सोनी, गोपाल मुंदडा ,शिवप्रकाश मालपाणी, विष्णू कुमार करवा, अर्चना झंवर, नितीन तोतला, संतोष करवा, दिनेश भक्कड, गणेश मोदीनी, रोहित मानधानी ,चेतन सारडा ( सांगली), निर्मला करवा ,शकुंतला मंत्री, कल्पना मुंदडा ,किरण राठी, यांनी सहभागी होत सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हाध्यक्ष नूतन दाड, सचिव सुनिता मालपाणी, सखी सहेली मंडळाच्या अध्यक्षा भारती मानधानी, सचिव सोनल मानधना, रजनी मानधानी, राजश्री भक्कड, सुवर्णा करवा, अनुराधा गट्टानी ,पूजा अजमेरा, पायल बजाज, रिया बागडी, रिचा राठी ,पूजा बांगड, पुनम दाड, संध्या दाड ,मोनिका दाड ,सरिता मोदानी ,राधिका राठी, उज्वला चेचानी, वर्षा मंत्री ,वृषाली बजाज, रिया इंदानी ,अनुराधा लोहिया ,अंकिता झंवर ,राधिका चेचानी ,पूनम बांगड, रश्मी बागडी, श्रद्धा तोष्णीवाल, प्रियंका सोमानी, मोनिका राठी, राखी तापडिया ,पूजा बजाज, निधी जेथलिया, पूजा सोनी, पायल तापडिया ,दीपा तापडिया, राधिका तापडिया यांच्यासह जालना जिल्हा माहेश्वरी महिला संघटन आणि सखी सहेली माहेश्वरी महिला मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

## कैलास पवार खून प्रकरणी २ महिला आरोपींना अटक ;स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

जालना। प्रतिनिधी

दिनांक १९/०४/२०२६ रोजी मिनाबाई कैलास पवार, वय-४५ वर्ष, रा. इंदेवाडी, जालना यांच्या फिर्यादीवरून १७/०४/२०२६ रोजी १४:०० ते दिनांक १९/०४/२०२६ रोजीचे सकाळी १०:०० वा.चे सुमारास दरेगाव येथील वनीकरणामध्ये फिर्यादीचे पती कैलास दत्तु पवार, रा. इंदेवाडी यास आरोपी विकी मांडोळे २) शुभम साळवे, ३) ममता राहुल साळवे ४) साक्षी राहुल साळवे यांनी संगनमताने जिवे ठार मारुन खून केला आहे. अशा फिर्यादीवरुन पोलीस ठाणे तालुका जालना येथे गु.र.नं. १९१/२०२६ कलम १०३(१),३ (५) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल झालेला आहे,

सदर गुन्हयातील पळुन गेलेल्या महिला आरोपीतांचा शोध घेणेबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधु यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. त्यानुषंगाने सदर गुन्हयातील आरोपीचा शोध घेणेबाबत मा. पोलीस निरीक्षक पंकज जाधव, स्थानिक गुन्हे शाखा, जालना यांनी पथक तयार करुन पथकास सुचना दिल्याने दिनांक २१/०५/२०२६ रोजी गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेत असतांना



गुप्तबातमीदारामार्फत माहिती मिळाली की, गुन्हयातील आरोपी ममता कैलास पवार ऊर्फ ममता राहुल साळवे, वय-४२ वर्ष, रा. रमाबाईनगर, साक्षी राहुल साळवे, वय-२३ वर्ष, रा. रमाबाईनगर, जालना हया मानेगांव, ता.जि. जालना येथे आहे. त्यानुषंगाने मानेगाव येथे जावुन दोन्ही आरोपी महिलांना ताब्यात घेवुन त्यांना पुढील तपासकामी तालुका पोलीस ठाणे, जालना येथे हजर केले आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू , मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि. सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ व पोलीस अंमलदार प्रभाकर वाघ, ईरशाद पटेल, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, अशोक जाधवर, रेणुका बांडे, अरुणा गायकवाड सर्व स्थानिक गुन्हे शाखा यांनी केली आहे.

## जामखेड तालुक्यात अवैध सावकारीविरोधात मोठी कारवाई

### सहकार विभागाच्या एकाच वेळी तीन ठिकाणी धाडी!

जामखेड । प्रतिनिधी

अवैध सावकारीविरोधात सहकार विभागाची धडक कारवाई; तीन ठिकाणी छापे, आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त करण्यात आले आहेत. जामखेड तालुक्यात अवैध सावकारीच्या तक्रारींची गंभीर दखल घेत सहकार विभागाने पोलिस प्रशासनाच्या मदतीने मोठी धडक कारवाई केली. तालुक्यात एकाच वेळी ३ ठिकाणी छापे टाकत अवैध सावकारी करणाऱ्यांविरोधात कारवाईचा बडगा उगारण्यात आला. या कारवाईत कोरे धनादेश, खरेदीखते तसेच इतर आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त करण्यात आल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जामखेड तालुक्यात अवैध सावकारी सुरू असल्याबाबत प्रशासनाकडे आवश्यक कागदपत्र सह तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींच्या आधारे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, विभागीय निबंधक संभाजी निकम आणि जिल्हा निबंधक मंगेश सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निबंधक तथा सावकारांचे सहाय्यक निबंधक दिलीप तिजोरे यांनी जिल्ह्यातील विविध क्षेत्रीय अधिकाऱ्यांचा समावेश करून , जामखेड चे पोलिस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या समन्वयाने विविध पथके तयार करून सदरची कारवाई केली. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम १६ अन्वये ही कारवाई करण्यात आली.

> ''सहकार आणि पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने तीन ठिकाणी छापे टाकून महत्त्वाची कागदपत्रे जप्त केली आहेत. सध्या या सर्व कागदपत्रांची सखोल पडताळणी व चौकशी सुरू आहे. सदर पडताळणीअंती पुढील आवश्यक ती कारवाई केली जाईल. नागरिकांनी आर्थिक गरजेसाठी शक्यतो राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, पतसंस्था अथवा परवाना धारक सावकार यांच्याकडूनच कर्ज घ्यावे.
>
> -दिलीप तिजोरे, सहाय्यक निबंधक तथा सावकारांचे सहाय्यक निबंधक, जामखेड

सहकार विभागाचे १६ अधिकारी-कर्मचारी आणि पोलिस दलाचे ६ अधिकारी-कर्मचारी अशा २२ जणांच्या संयुक्त पथकाने मंगळवारी दोन संशयित ठिकाणांवर छापे टाकले. अचानक झालेल्या या कारवाईमुळे अवैध सावकारांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. छाप्या दरम्यान कोरे धनादेश, खरेदीखते, आर्थिक नोंदी असलेल्या वह्या, तसेच इतर महत्त्वाचे दस्तऐवज जप्त करण्यात आले आहेत. या कागदपत्रांच्या आधारे पुढील तपास आणि चौकशी सुरू करण्यात आली आहे. सहकार विभागाने तालुक्यातील सर्व नागरिकांना अवैध सावकारीविरोधात सहाय्यक निबंधक कार्यालय, जामखेड येथे आवश्यक कागदपत्रासहा तक्रार दाखल केल्यास कठोर कारवाई केली जाईल असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## सासऱ्याचा खून केल्याप्रकरणी जावायास जन्मठेप

जालना । प्रतिनिधी

सासू सासऱ्याचा खून केल्याप्रकरणी जावई आरोपी किशोर शिवदास पवार वय ३८ रा. आडुळ, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांस जन्मठेप व दंड ठोठावला आहे. घटनेची थोडक्यात माहितीअशी की, अंबड येथील शंकर नगर येथे मयताच्या घरी दि. २९. ०३.२०२३ रोजी सकाळी ०८.३० वाजेच्या सुमारास फिर्यादी मंदाकिनी गिज्ञानदेव भोसले व तिचा भाऊ पारलेस काळे आणि मयत पंडीत भानुदास काळे असे मयताच्या घरी असताना फिर्यादीची बहिण नंदा हिचा नवरा आरोपी किशोर व त्याचे मित्र नितीन लाला जाधव व आरोपी बाल आपचारे, अजय दिगंबर आंबेकर यांना यातील फिर्यादी साक्षीदार व मयत हे अनुसुचित जाती व जमातीचे सदस्य आहेत हे त्यांना माहित असताना सुद्धा आरोपी व बाल आपचारे यांनी संगनमत करुन मयताच्या घरी येउन त्यांना आरोपी किशोर याने मयतास शिवीगाळ करुन ''तु माझी बायको नांदायला का पाठवित नाही'' असे म्हणुन आरोपी किशोर आरोपी क. २ नितीन आरोपी क. ३ अजय या सर्वांनी मिळुन फिर्यादीचे वडीलास (मयतास) लाथाबुक्क्याने मारहाण केली व आरोपी क. १ याने त्याच्याकडील बटुकीतुन मयताचे गळयावर व पाठीवर अशा दोन गोळया मारुन खुन करुन सोबत आणलेल्या मोटार सायकलवर बसुन पळून गेले.

तसेच गुन्हा घडलयानंतर आरोपी क. १ किशोर याने पाचोड येथे जाउन आरोपी क. ३ सचिन प्रकाश पवार यास त्याने आरोपी क. ४ धर्मा मुबारक काळे याचे कडुन खरेदी केलेल्या बंदुक पिस्टल ने गोळ्या मारुन त्याचे सास-यास जिवे ठार मारल्याचे सांगुन गुन्हयात वापरलेली बंदुक पिस्टल आरोपी सचिन याच्याकडे लपवायला दिल्याचे निश्पन्न झाले म्हणुन अशा आशयाची फिर्याद मंदाकिनी गिज्ञानदेव भोसले हिने अंबड पोलीस स्टेशना दि. २९.०३.२०२३ रोजी दिल्यावरुन गुन्हा क. २१९/२०२३ नोंद करुन आरोपी विरूद्ध भा. द. वि कलम ३०२, ४४९,३२३,५०४,५०६ ३४ सह ३/२५ भारतीय हत्यार कायदा सह कलम ३(२), (व्ही ए), अ.जा.ज.अ.प्र.का प्रमाणे नोद करण्यात आला. सदर प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक साजिद अहेमद यांनी करुन आरोपी किशोर शिवदास पवार या आरोपीस रा. आडुळ आणि उर्वरित फरार आरोपी याच्या विरूद्ध कलम सी.आर.पी.सी. २९९ प्रमाणे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सदरील प्रकरणात सरकार पश्चातर्फे १० साक्षीदार तपासण्यात आले. त्यात फिर्यादी मंदाकिनी भोसले, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार पारलेश काळे, गिज्ञानदेव भोसले, घटनास्थळ पंच, कपडे जप्ती पंच, मोटारसायकल जप्ती पंच, अंगझडती पंच, निवेदन पच जप्ती पंचनामा याच्या साक्ष महत्वाच्या ठरल्या सदर प्रकरणाचा तपास पोलीस अधीक्षक जालना श्री तेगबीरसिंग संधु, डी. वायएसपी सिद्देश्वर धुमाळ, अंबड याच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि साजिद अहेमद यांनी सखोल तपास केला. तसेब पो.उप.नि. आदिनाथ ढाकणे, डी. वायएसपी मुकुंद आघाव, सुनिल पाटील तर सरकार पक्षातर्फे श्री. ॲड. वाल्मीक आ. घुगे जिल्हा सहायक सरकारी अभियोक्ता, अंबड यांनी अत्यंत प्रभावी युक्तीवाद करून सदर प्रकरणात काम बघीतले. सदरील युक्तीवाद ग्राहय धरुन विद्यमान न्यायालयाने आरोपीस जन्मठेप आणि रुपये १६०००/- दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली तसेच दंड न भरल्यास एक वर्षाची साधी कैद अशी शिक्षा टोलावण्यात आली.

## डॉ. वसीम शब्बीर पटेल यांची प्रोफेसर पदावर पदोन्नती

मंठा। प्रतिनिधी

मौलाना आझाद राष्ट्रीय उर्दू विद्यापीठ, हैदराबाद येथे असोसीयेट प्रोफेसर म्हणून कार्यरत असलेले डॉ. वसीम शब्बीर पटेल यांची प्रोफेसर पदावर पदोन्नती करण्यात आली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचा सेवली येथे सत्कार करण्यात आला.



डॉ. वसीम शब्बीर पटेल हे सेवली येथील माजी सरपंच तथा प्रसिद्ध कवी स्व. शब्बीर पटेल यांचे चिरंजीव असून सेवली ग्रामपंचायत अजीम पटेल यांचे मोठे बंधू आहेत. या सत्कार सोहळ्याला गावातील नागरिक, मित्रपरिवार, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. वसीम पटेल यांनी शिक्षण, संशोधन आणि विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले असून आपल्या अभ्यासू वृत्ती, मेहनत आणि उत्कृष्ट सेवेमुळे त्यांनी विशेष ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.यावेळी प्राध्यापक तथा माजी सरपंच शेख नवीद यांनी डॉ. वसीम शब्बीर पटेल यांचे अभिनंदन केले.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
शुक्रवार दि.२२ मे २०२६


# अंबाजोगाईतही खासगी क्लासेसमधून लाखो रुपयांची उलाढाल

## मोटेगावकर, कुलकर्णीचे वारसदार या शहरातही तयार, शेकडो विद्यार्थी एका हॉलमध्ये बसवून लाखोंची लूट

अंबाजोगाई । प्रतिनिधी

नीट पेपर फुटी प्रकरणानंतर लातूरचे डॉ.मोटेगावकर आणि कुलकर्णी हे तपास यंत्रणेच्या रडारवर आहेत. लातूरप्रमाणेच खासगी कोचिंग क्लासेसवाल्याची अंबाजोगाईतही परिस्थिती आहे. याठिकाणीही शेकडो विद्यार्थी एका हॉलमध्ये बसून पालकाकडून लाखो रुपये वसूल केले जातात. आता या प्रकरणामध्ये अंबाजोगाईकडेही यंत्रणेचे लक्ष लागले आहे.

आपलीच गुणवत्ता दर्जेदार असल्याची बॅनरबाजी शिकवणी, कोचिंग क्लासेस वाल्यांनी मोठया प्रमाणात केली असल्याने विद्यालये सुरू होताच विद्यार्थ्यांना शिकवणी वर्गाचे आकर्षण वाटत आहे शहराच्या मुख्य आणि मध्यवर्ती भागात मोठया प्रमाणात शिकवणी, कोचिंग क्लासेसवाल्यांनी आपली दुकाने उघडले असून शिक्षणाच्या नावावर चक्क व्यवसायाची दुकाने थाटली आहेत. जास्तीच्या बॅनरबाजी मुळे शहरात शिकवणी वर्ग जोमात असल्याचे दिसून येत आहे. शहरात गेल्या अनेक वर्षापासून बेरोजगार तरुणांच्या माध्यमातून खाजगी शिकवणी वर्गांचे पेव फुटले असून

विद्यार्थ्याकडून शिकवणी वर्गाच्या नावावर लाखो रुपये जमा होत आहेत.



याकडे शिक्षण विभागाचे दुर्लक्ष आहे.

विशेष म्हणजे आपलीच शिकवणी लावण्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी आकर्षक बक्षीसे देण्याचीही योजना आखली आहे या सर्व प्रकाराला पालक बळी पडून लाखो रुपये यावर खर्च करीत आहेत शिकवणी वर्गातील विद्यार्थ्याची छायाचित्रे बॅनरवर प्रसारित करून आपलेच क्लासेस कसे गुणवंत घडवितात याची माहिती देत आहेत

परंतु दाटीवाटीने विनापरवाना लागलेल्या बॅनर कडे प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. तर गेल्या अनेक वर्षात एकदाही शिक्षण या खाजगी कोचिंग क्लासेसची कसलीही चौकशी कोणत्याही विभागाकडून केली गेली नसल्याचे शिक्षण क्षेत्रातील जाणकार सांगतात.काहीही झाले तरी विद्यार्थी शाळा कॉलेज पेक्षा शिकवणी वर्गाकडे आकर्षित होऊन भरमसाठ फिस भरून तिथेच प्रवेश घेत आहेत. शाळा कॉलेज बंद असताना पुढील वर्गाच्या तयारीसाठी शहरातील कोचिंग क्लासेस सुरु करण्यासाठी कोणी परवानगी दिली असा संतप्त सवाल उपस्थित करण्यात येत असून कसलेही नियम न पाळता चालवण्यात येणारे कोचिंग क्लासेस तात्काळ बंद करण्यात यावेत अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. अंबाजोगाई शहरात मात्र खाजगी कोचिंग क्लासेस चालवणा-या संस्थांनी धुमाकूळ घातला आहे. पान ३ वर

# शहराच्या स्वच्छता व पाणीपुरवठ्यासाठी मोठा दिलासा; पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाकडून ४८.२९ कोटींचा निधी

## गटनेते फारुख पटेल व नगरसेवक अमर नाईकवाडे यांची माहिती

बीड । प्रतिनिधी

शहरातील नागरिकांना स्वच्छता व पाणीपुरवठ्याच्या मूलभूत सुविधांमध्ये मोठा दिलासा मिळणार असून, पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार केंद्र शासनाकडून बीड नगर परिषदेला ₹४८,२९,०७,४८२/– (अक्षरी रुपये अठ्ठेचाळीस कोटी एकोणतीस लाख सात हजार चारशे ब्यार्ऐंशी फक्त) इतका निधी प्राप्त झाला आहे, अशी माहिती बीड नगर परिषदेचे गटनेते फारुख पटेल व नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी दिली आहे.





विशेष म्हणजे, आर्थिक वर्ष २०२३–२४, २०२४–२५ आणि २०२५–२६ या प्रशासकीय कालावधीतील पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत मंजूर झालेला निधी संबंधित वर्षांमध्ये बीड नगर परिषदेला प्राप्त झाला नव्हता. सदर प्रलंबित निधी आता चालू वर्षात एकत्रित स्वरूपात नगर परिषदेला प्राप्त झाला असून, त्यामुळे शहरातील प्रलंबित नागरी सुविधा विकासकामांना मोठी गती मिळणार आहे. हा निधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकसंख्येच्या निकषावर केंद्र शासनामार्फत वितरित केला जातो. त्यानुसार बीड जिल्ह्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या लोकसंख्येनुसार निधी मंजूर करण्यात आला असून, बीड नगर परिषदेला त्यामध्ये महत्त्वपूर्ण वाटा प्राप्त झाला आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हा निधी "बंधनकारक अनुदान ( )" स्वरूपात असून, त्यातील ५० टक्के निधी पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेत पान ३ वर

# महिला भाजी विक्रेती विरुध्द झालेली कारवाई खपवून घेणार नाही –आ.विजयसिंह पंडित

बीड । प्रतिनिधी

शहरातील भाजी मंडई समोर अतिक्रमण विरोधी पथकाने केलेल्या कारवाईचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला आहे. आ. विजयसिंह पंडित यांनी या प्रकरणाची दखल घेऊन मुख्याधिकाऱ्यांसह संबंधितांना या प्रकरणी जाब विचारला, मुळात पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांसह जबाबदार अधिकाऱ्यांनी या कारवाई संदर्भात कोणतेही आदेश दिले नसल्याची बाब उघडकीस आली आहे. झालेल्या प्रकाराची आ. पंडित यांनी गंभीर दखल घेऊन भविष्यात गोर–गरीब भाजी विक्रेत्यांविरुध्द अन्यायकारक कारवाई खपवून घेतली जाणार नाही असा इशारा त्यांनी दिला. नियमानुसार अतिक्रमण निघाले पाहिजे, अतिक्रमण विरोधी कारवाई करताना दुजाभाव करू नका हातावर पोट असलेल्या लोकांना सावरण्याची संधी द्या अशा सूचनाही त्यांनी संबंधितांना दिल्या आहेत.



बीड शहरातील भाजी मंडई समोर बुधवार, दि.२० मे रोजी अतिक्रमण विरोधी पथकाने केलेल्या कारवाईमध्ये एका वयोवृध्द महिला भाजी विक्रेतीचा भाजीपाला फेकून दिल्याचा व्हिडीओ सध्या सोशल मिडीयावर व्हायरल होत आहे. या बाबत अनेक उलट–सुलट प्रतिक्रिया येत आहेत. आ. विजयसिंह पंडित यांनी मुंबई मध्ये मंत्रालयीन कामात व्यस्त असतानाही या गंभीर प्रकरणाची दखल घेतली. नगर परिषदेचे मुख्याधिकारी, नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलताताई पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, गटनेते फारुक पटेल यांच्यासह पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. सोशल मिडीयावर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओ मधील प्रकाराच्या अनुषंगाने अशा प्रकारे भाजी विक्रेत्यांचा भाजीपाला फेकून देणे अथवा उचलून घेऊन येण्याच्या कोणत्याही सूचना पालिका प्रशासनाने संबंधितांना दिल्या नसल्याची बाब यामध्ये उघडकीस आली. विशेष म्हणजे सदर अतिक्रमण विरोधी कारवाई होताना स्वच्छता निरीक्षक या घटनेच्या वेळी तेथे उपस्थित नव्हते. त्यामुळे नगर परिषदेने या कारवाईचे समर्थन केले नाही. मात्र अशा प्रकारच्या घटना भविष्यात घडू नयेत या बाबत उपाययोजना पान ३ वर

# बांधकामावरून पडून युवकाचा दुर्दैवी मृत्यू मोहा येथील घटनेने बीडमध्ये हळहळ

बीड । प्रतिनिधी

मोहा ता. परळी येथील बांधकाम सुरू असलेल्या इमारतीवरून खाली पडल्याने एका २८ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अमोल विलास माने (वय २८, रा. गोविंद नगर, धानोरा रोड, बीड) असे मृत युवकाचे नाव आहे.या दुर्दैवी घटनेची सिरसाळा पोलीस ठाण्यात बीएनएसएसच्या कलम १९४ अंतर्गत अनैसर्गिक मृत्युची नोंद करण्यात आली असुन पोलीस हवालदार विष्णु नामदेव शेंडगे अधिक तपास करत आहेत .



याबाबत मयताची आई निर्मला विलास माने यांनी सिरसाळा पोलीस ठाण्यात खबर दिली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १२ मे २०२६ रोजी पहाटे साडेतीनच्या सुमारास कंत्राटदार मुस्ताक कादरी व कामगार अक्षय गायकवाड आणि शेख अजीन हे त्यांच्या घरी आले. त्यांनी अमोल हा मोहा येथील बांधकाम साईटवर काम करत असताना दुसऱ्या मजल्यावरील टेरेसवरून खाली पडल्याचे सांगितले. त्याच्या डोक्याला व पायाला गंभीर दुखापत झाल्याने त्याला तातडीने शासकीय रुग्णालय, अंबाजोगाई येथे उपचारासाठी दाखल करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. मात्र नंतर नातेवाईकांकडून अमोलचा उपचारादरम्यान पान ३ वर

# पाटोदा तालुक्यातील दिव्यांगांचे तीन महिन्यांचे मानधन थकीत

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील दिव्यांग बांधवांना गेल्या तीन महिन्यांपासून हक्काचे मानधन मिळालेले नाही. याबाबत 'प्रहार दिव्यांग क्रांती संघटना, पाटोदा' यांच्या वतीने पाटोदा तहसीलदारांना निवेदन देऊन मानधन तत्काळ जमा करण्याची मागणी करण्यात आली आहे. मागणी पूर्ण न झाल्यास तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिव्यांगांनी दिला आहे.अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देतातदिव्यांग बांधवांनी निवेदनात म्हटले आहे की, मार्च महिन्यांपासून मानधनासाठी ते तहसील कार्यालयाचे खेटे मारत आहेत. मात्र, येथील संबंधित अधिकारी त्यांना योग्य माहिती न देता उडवाउडवीची उत्तरे देऊन मानसिक त्रास देत आहेत.तांत्रिक कारणांमुळे दिव्यांग वेठीसगेल्या दोन महिन्यांपासून यु.डी.आय.डी. (णऊखऊ), ई–केवायसी (ए–घधउ) आणि आधार लिंक यांसारख्या तांत्रिक कारणांचे दाखले देत लाभार्थ्यांना लाभापासून वंचित ठेवले जात आहे. दिव्यांगांनी सर्व आवश्यक कागदपत्रे दोन ते तीन वेळा तहसील कार्यालयात जमा करूनही अद्याप त्यांच्या बँक खात्यावर किंवा पोस्ट ऑफिस खात्यात मानधन जमा झालेले नाही.

पान ३ वर

# रोहयोमंत्री भरत गोगावले यांच्या उपस्थितीत आज शिवसेनेची महत्त्वपूर्ण बैठक

## शिवसैनिकांनी उपस्थित रहावे : जगताप, मुळूक, गलधर, नवले

बीड । प्रतिनिधी

जिल्हा शिवसेनेच्या वतीने शुक्रवार (दि.२२) रोजी सकाळी ११:०० वाजता शहरातील हॉटेल ऑलिव्ह येथे महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. राज्याचे रोहयो मंत्री तथा बीड जिल्हा शिवसेनेचे संपर्कमंत्री भरत शेठ गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक पार पडणार आहे.



शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बीड जिल्ह्याच्या संपर्कमंत्री पदी भरत गोगावले यांची नियुक्ती केल्यानंतर त्यांचा हा पहिलाच बीड दौरा आहे. त्यामुळे पक्ष संघटना, कार्यकर्त्यांशी संवाद आणि आगामी काळातील संघटनात्मक नियोजनाच्या दृष्टीने या बैठकीकडे लक्ष लागले आहे.

या बैठकीस शिवसेनेचे नेते संजय माशीलकर, संपर्कप्रमुख मनोज शिंदे, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, माजी आमदार संगीता ताई ठोंबरे यांच्यासह विविध पान ३ वर

# शारदा हॉस्पिटलच्या आरोग्य शिबिरास पाचेगाव येथे उत्स्फूर्त प्रतिसाद; जयसिंग पंडित यांची विशेष उपस्थिती

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई येथील शारदा मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या पाचेगाव येथील माध्यमिक विद्यालयात घेण्यात आलेल्या मोफत आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, जयभवानी शिक्षण संस्थेचे सचिव तथा शिवशारदा मल्टीस्टेटचे संस्थापक जयसिंग पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या शिबिराचा पाचेगाव आणि पंचक्रोशीतील शेकडो रुग्णांनी लाभ घेतला.

शारदा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट गेवराई यांच्यावतीने गुरुवार दिनांक २१ मे रोजी सकाळी आठ ते दुपारी दोन या कालावधीमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन पाचेगाव येथील सरपंच तुकाराम



प्रधान यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी जयभवानी शिक्षण संस्थेचे सचिव तथा शिवशारदा मल्टीस्टेटचे संस्थापक जयसिंग पंडित, उपसरपंच सुनील जाधव, श्रीमती आयशा पटेल, अमोल डरपे,श्रीकृष्ण वेताळ, गोकुळ गुरव, खंडू शेळके, रावसाहेब काळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. शारदा मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटलच्या वतीने आयोजित शिबिरास जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव जयसिंग पंडित यांनी भेट देऊन शिबिरास मार्गदर्शन केले. यावेळी महिलांचे आजार, लहान मुलांचे आजार, रक्त, बीपी, शुगर तसेच दाताचे आजार इत्यादी सर्व आजारावर मोफत उपचार करण्यात आले. याप्रसंगी शारदा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. अजयसिंह पंडित, डॉ. फिरोज शेख, मनोजकुमार सर, पान ३ वर

# आष्टीत सोनसाखळी चोरांचा हैदोस; पोलिसांच्या भूमिकेवर संताप

आष्टी । प्रतिनिधी

शहरासह तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सोनसाखळी चोरीच्या घटनांनी अक्षरशः थैमान घातले असून महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भररस्त्यात महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसकावून चोरटे पसार होत असल्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. विशेष म्हणजे अनेक घटना घडूनही पोलिस प्रशासनाकडून प्रभावी कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

आष्टी शहर व परिसरातील ग्रामीण भागात गेल्या महिनाभरात दहाहून अधिक महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या चोरट्यांनी ओरबाडून नेल्याच्या घटना समोर आल्या आहेत. विशेषतः पन्नास वर्षांवरील महिला चोरट्यांच्या टार्गेटवर असल्याचे चित्र आहे. धार्मिक कार्यक्रम, हरिपाठ किंवा बाजारातून घरी परतणाऱ्या महिलांना लक्ष्य केले जात असल्याने महिलांनी एकट्याने बाहेर पडणे धोक्याचे बनले आहे.

दरम्यान, वाढत्या गुन्हेगारीमुळे आष्टी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक तसेच डीवायएसपी यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. सतत घडणाऱ्या चोरीच्या घटना हे संबंधित अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणाचे जिवंत उदाहरण आहे, असा सूर आष्टी शहरामध्ये सर्वसामान्य नागरिकामधुन उमठत आहे. शहरात अवैध धंदे मोठ्या प्रमाणावर सुरू असून संबंधित अधिकारी केवळ हप्तेखोरीत मश्गुल असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला. गुन्हेगारांवर कारवाई करण्याऐवजी अवैध धंद्यांकडे डोळेझाक केली जात आहे. त्यामुळे चोरट्यांचे मनोबल वाढले असून सर्वसामान्य नागरिक भयभीत झाले आहेत, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे. कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती दिवसेंदिवस ढासळत चालली असून महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. पोलिसांचा धाक संपल्याने गुन्हेगार भररस्त्यात महिलांना लक्ष्य पान ३ वर

# डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या उपस्थितीत आज आष्टीत बैठक

बीड । प्रतिनिधी

आयुष्यमान भारतचे समन्वयक डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या उपस्थितीमध्ये आज आष्टी पंचायत समितीमध्ये योजनेचा आढावा घेण्यासाठी सकाळी १०:३० वाजता बैठक होणार असून या बैठकीला आ. सुरेश धस उपस्थित राहणार आहेत. बीड जिल्ह्यामध्ये आयुष्यमान भारत योजना अंतर्गत लाभ देणाऱ्या रुग्णालयाच्या प्रमुखांची तसेच प्रशासनाची बैठक होणार असून या बैठकीला रुग्णालयाच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. ही बैठक झाल्यानंतर आओमप्रकाश शेटे अहिल्यानगर येथे बैठक घेतील.

# छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकांसाठी प्रत्येकी १ कोटी निधीची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज तसेच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारक व परिसर सुशोभीकरणासाठी वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत प्रत्येकी १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा,अशी मागणी धनंजय (पापा) सोळंके यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, माजलगाव नगरपरिषद हद्दीत आमदार प्रकाश सोळंके यांच्या माध्यमातून एस.टी. महामंडळाच्या जागेत ठराव मंजूर करून नवीन बसस्थानक परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासाठी १० बाय १० जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच जुने बसस्थानक परिसरात विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठीही १० बाय १० जागा निश्चित करण्यात आली आहे.या दोन्ही स्मारकांच्या उभारणीसाठी आमदार प्रकाश सोळंके यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून फाउंडेशनसाठी निधी उपलब्ध करून दिला असून भूमिपूजनही पार पडले आहे.त्यामुळे आता स्मारकांची भव्य उभारणी व परिसराचे सुशोभीकरण करण्यासाठी शासनाने विशेष निधी द्यावा,अशी मागणी करण्यात आली आहे.धनंजय (पापा) सोळंके यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक व परिसरासाठी १ कोटी रुपये तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक व परिसरासाठी १ कोटी रुपये निधी वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून मंजूर करण्याची विनंती केली आहे.या मागणीमुळे माजलगाव शहराच्या सांस्कृतिक व सामाजिक वैभवात भर पडणार असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# जायकवाडीच्या पाण्यासाठी बैलगाडीतून मिरवणुका

## बंगाली पिंपळा येथील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

बीड, प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त, ऊसतोड मजूर व कंगाल झालेल्या शेतकर्यांचा विकास जायकवाडी धरणाचे पाणी शेतीला मिळाल्याने होईल, बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागातील शेतीला जायकवाडी धरणाचे पाणी देण्याची मागणी बंगाली पिंपळा येथे शेतकऱ्यांनी केली. यासाठी बैलगाडीसह गावातून मिरवणूक काढत शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागातील शेतीला जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे, गोदावरी–सिदफणा नदीजोड प्रकल्प गतीने करावा, श्री क्षेत्र भगवान गड ते मादळमोही–मजलगावपर्यंत उपकालवा करावा, १६८



टीएमसी पाण्यात बीड जिल्ह्यातील शेतीला हक्काचे पाणी मिळावे यासह इतर मागण्यांसाठी लोकलढा आंदोलनाच्या वतीने २९ मे रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बैलगाडी मोर्चा काढण्यात येणार आहे. या संदर्भात शेतकऱ्यांना माहिती देण्यासाठी गेवराई तालुक्यातील बंगाली पिंपळा येथे लोकलढा आंदोलनाची बैठक झाली. या बैठकीपूर्वी बंगाली पिंपळा गावामध्ये सर्व शेतकरी, तरुणांनी एकत्र येत गावातून वाजत–गाजत बैलगाडीसह मिरवणूक काढली. बंगाली पिंपळा व परिसरात शेतीला बारमाही पाणी नसल्याने सातत्याने शेती तोट्यात जाते, हीच परिस्थिती जिल्ह्यातील अनेक ठिकाणी आहे. श्री क्षेत्र भगवान गड, मातोरी, कोळगाव, मादळमोही, सिरसमार्ग, पाडळसिंगी, पाचेगाव ते तालखेडपर्यंतच्या शेतीला जायकवाडी धरणाचे पाणी मिळणे गरजेचे आहे, गोदावरी–सिंदफणा नदीजोड प्रकल्प गतीने राबवावा व कोकणचे पाणी गोदावरी खोर्यात येणार आहे, त्यात बीड जिल्ह्यातील शेतीला किती पाणी मिळेल हे सांगावे यासाठी लोकलढा आंदोलनच्या वतीने सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. विदर्भात ९४ हजार कोटी रुपयांचा नदीजोड प्रकल्प होत आहे तर दोन दिवसांपूर्वीच नाशिक, जळगाव व धुळे जिल्ह्यासाठी पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# हुकूमशाहीचा अंत झाल्याशिवाय राहणार नाही, लवांडे प्रकरणावरुन शशिकांत शिंदेंचा हल्लाबोल

पुणे । प्रतिनिधी

वारकरी संप्रदाय विषयी चिथावणीखोर वक्तव्य केल्याच्या आरोपाखाली राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. पुण्यातील वाघोली पोलिस ठाण्यात ८ मे रोजी विकास लवांडे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. यावर राष्ट्रवादी काँग्रेस सरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. विकास लवांडे यांना झालेली अटक हा लोकशाहीचा खून आहे. नागरिकांना आपलं मत मांडण्याचा अधिकार सुद्धा आज उरलेला नाही, अशी टीका शशिकांत शिंदे यांनी केली.

हल्ली पोलीस यंत्रणा ही सरकारच्या दबावाखाली काम करते हे वारंवार आणि प्रत्येक वेळेला सिद्ध झालं असल्याची टीका शशिकांत शिंदे यांनी केली. त्याचंच प्रत्यंतर म्हणजे विकास




लवांडेंवर ज्यांनी शाईफेक केली त्यांना कुठल्याही प्रकारची अटक झाली नाही. याउलट खोटी तक्रार दाखल करून विकास लवांडेंवरच पोलिस कारवाई केली गेली. पोलिस प्रशासनाने इतकी तत्परता शाई फेकणाऱ्यांवर कारवाई करताना दाखवली असती, तर आम्ही समजू शकलो असतो परंतु न्याय देणारे जर पूर्णपणे सरकारच्या ताटाखालचं मांजर झाले असतील, तर न्याय कोणाकडे मागणार ? दिवस येतात आणि जातात. मी स्वतः व आमदार रोहित पवार वाघोली पोलिस स्टेशन येथे जाऊन आलो आहोत.

विकास लवांडे हे लढणारे सैनिक आहेत, घाबरणारे नाहीत. दडपशाही आणि हुकूमशाही फार काळ टिकत नसते. आता केवळ एका कोक्रोच जनता पार्टीचं नाव समोर आलं तरी देशातल्या तरुणांचा सरकारप्रती किती उद्रेक आहे हे पहायला मिळतंय. जे होतंय ते चांगल्यासाठीच होतंय. अश्या पद्धतीने सर्वसामान्यांवर अन्याय होत राहिला तर ही जनताच उठाव करेल आणि नक्कीच त्यावेळेला या हुकूमशाहीचा अंत झाल्याशिवाय राहणार नाही अशी टीका शशिकांत शिंदे यांनी केली. युट्युब वर मिळालेल्या एका व्हिडिओच्या माध्यमातून लवांडे यांनी वारकरी संप्रदाय विषयी आक्षेपार्य विधान केला असल्याचा आरोप एका महिलेने केला होता. संबंधित महिलेने यानंतर वाघोली पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. या गुन्ह्याच्या अनुषंगाने लवांडे यांनी आज न्यायालयात अंतरिम जामिनासाठी अर्ज केला होता. मात्र न्यायालयाने तो जामीन अर्ज फेटाळला आहे. त्यामुळं पोलिसांनी आज लवांडे यांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर पुढील कारवाई सुरु केली आहे.

# नसरापूर बाल अत्याचार व खून प्रकरणी विशेष न्यायालयात जलदगती सुनावणी सुरु

पुणे । प्रतिनिधी

**नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिचा खून केल्याप्रकरणी अटक आरोपी भीमराव कांबळे याच्याविरोधात दाखल खटल्याची सुनावणी गुरुवारपासून (दि. २१ मे) विशेष न्यायालयात चालणार आहे.**



विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयात दररोज सुनावणी घेऊन हा खटला जलदगतीने निकाली काढण्याचा प्रयत्न सरकार करणार आहे. खटल्याच्या प्रारंभी सरकार पक्षातर्फे भूमिका मांडून आरोप निश्चितीच्या प्रक्रियेसाठी अर्ज केला जाईल. आरोपनिश्चिती झाल्यानंतर खटल्याची सुनावणी सुरू होईल. या प्रकरणात आरोपी भीमराव कांबळे (वय ६५, रा. भोर) याच्याविरोधात पुणे ग्रामीण पोलिसांनी ११०० पानांचे आरोपपत्र सादर केले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार या प्रकरणाच्या सुनावणीसाठी विशेष न्यायालय नियुक्त करण्यात आले आहे.या खटल्याची संवेदनशीलता लक्षात घेत सुनावणी 'इन कॅमेरा' पद्धतीने होणार आहे. या गंभीर प्रकरणात सरकार पक्षाची बाजू मांडण्यासाठी ड. अजय मिसर यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल्ल यांच्या नेतृत्वात निरीक्षक विजयमाला पवार यांच्यासह पथकाने १४ दिवसांत तपास पूर्ण करून आरोपीविरोधात भक्कम पुरावे गोळा केले आहेत. त्यामध्ये पन्नासहून अधिक साक्षीदारांचे जबाब, आरोपीला पीडितेसमवेत पाहणारे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय व न्यायवैद्यक अहवाल, सीसीटीव्ही चित्रीकरण आदी पुराव्यांचा समावेश आहे.

# तू माझी नाही झाली, तर कोणाचीच होऊ देणार नाही, तरुणीसह तिच्या मित्रावर ॲसिड हल्ला

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. तू माझी नाही झालीस, तर कोणाची नाहीस असे म्हणत पुण्यात तरुणी आणि तिच्या मित्रावर ॲसिड हल्ला करण्यात आल्याची घटना घडली आहे. पुणे पोलिसांनी कर्नाटकमध्ये जाऊन या प्रकरणातील आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेनं ही कारवाई केली आहे.

मित्रासोबत 'लिव्ह-इन रिलेशनशिप'मध्ये राहत असल्याच्या रागातून तरुणाने ॲसिड हल्ला केल्याची घटना घडली आहे. तू माझ्यासोबत का राहत नाहीस? तू माझी नाही झालीस, तर कोणाचीच होऊ देणार नाही, असे म्हणत एका माथेफिरुने तरुणीवर आणि तिच्या मित्रावर ॲसिड हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले आहे. श्रीराम मधु




सरुनवर (वय २०) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. २१ वर्षीय पीडित तरुणीने याबाबत बंडगार्डन पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. हा सगळा प्रकार २० मे रोजी रात्री २ वाजण्याच्या सुमारास पुण्यातील ताडीवाला रोड येथे घडला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुणी आणि तिचा मित्र हे दोघे पुण्याच्या एका हॉटेलमध्ये काम करतात. काम संपल्यानंतर बुधवारी पहाटे दोघेही ताडीवाला रोड येथील आपल्या राहत्या घराच्या दिशेने निघाले होते. याचवेळी आरोपी सरुनवर दबा धरुन बसला होता. पीडित तरुणी ही त्याचा रोष झुगारुन मित्रासोबत लिव्ह-इनमध्ये राहते, याचा राग त्याच्या मनात होता. श्रीरामने तिचा रस्ता अडवला आणि तू माझ्यासोबत का राहत नाहीस? तू माझी नाही तर कोणाचीच होऊ देणार नाही, अशी धमकी दिली. काही समजण्याच्या आतच, आरोपीने स्वतःसोबत आणलेल्या प्लास्टिक ड्रममधील 'ॲसिड'सारखा तीव्र ज्वलनशील रासायनिक पदार्थ तरुणीच्या अंगावर फेकला. हे केमिकल तरुणीच्या मानेवर, पाठीवर आणि दोन्ही पायांवर पडल्याने ती जागीच होरपळली. आरोपीने तिच्या मित्रांवर सुद्धा ॲसिड फेकले, ज्यामुळे त्याच्याही पायाला गंभीर दुखापत झाली. दोघेही जखमी झाले असताना, आरोपी अंधाराचा फायदा घेऊन तिथून पसार झाला. शहराच्या मध्यवस्तीत तरुणीवर ॲसिड हल्ला झाल्याचे समजताच पोलीस दलात प्रचंड खळबळ उडाली आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने आरोपीचा शोध घ्यायला सुरुवात केल्यानंतर पोलिसांनी थेट कर्नाटक गाठत आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत.

# पुणे महापालिकेत ७१ स्वच्छता कर्मचाऱ्यांवर चौकशीचे आदेश

पुणे: महापालिकेच्या स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती आणि कामकाजावर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. 'पगार एका विभागातून आणि काम दुसऱ्या ठिकाणी' अशा प्रकारामुळे शहरातील स्वच्छता व्यवस्थेवर परिणाम होत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक दत्ता बहिरट यांनी महापालिकेच्या मुख्य सभेत केला. याप्रकरणी ७१ स्वच्छता कर्मचाऱ्यांबाबत चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

महापालिकेच्या सोमवारी झालेल्या मुख्य सभेत बहिरट यांनी पॉइंट ऑफ इन्फर्मेशनद्वारे घोले रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील ७१ कर्मचाऱ्यांची यादी सादर केली. संबंधित कर्मचाऱ्यांचा पगार घोले रोड क्षेत्रीय कार्यालयातून



होत असला, तरी ते प्रत्यक्षात इतर क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत काम करीत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. बहिरट यांनी सभागृहात सांगितले की, घोले रोड परिसरात नियमित साफसफाई होत नसल्यामुळे अनेक भागांत घाणीचे सामाज्य निर्माण झाले आहे.

प्रशासनाकडून कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याचे कारण दिले जाते. मात्र, प्रत्यक्षात उपलब्ध कर्मचारी इतरत्र कार्यरत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे मूळ विभागातील मनुष्य बळावर अतिरिक्त ताण पडत आहे. याप्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यांना इतरत्र काम करण्याची परवानगी कोणी दिली? त्यामागचे कारण काय होते? अधिकृत आदेश होते का? तसेच परवानगी नसल्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर काय कारवाई होणार? असे सवालही बहिरट यांनी उपस्थित केले. याशिवाय रिक्त जागांसाठी बदली कर्मचारी का उपलब्ध करून दिले नाहीत? याचाही जाब त्यांनी प्रशासनाला विचारला.

या आरोपांनंतर महापालिका प्रशासनाने प्रकरणाची गंभीर दखल घेत चौकशीचे आदेश दिले आहेत. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी मुख्य सभेत मांडण्यात आलेल्या मुद्द्यांची सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिल्याचे सांगितले. तसेच, इतर क्षेत्रीय कार्यालयांतही अशाच प्रकारे कर्मचारी कार्यरत आहेत का? याची माहितीही तपासली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# मराठी चित्रपट महामंडळासाठी 'या' तारखेला होणार मतदान; निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

पुणे । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या कार्यकारी मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीचा सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून, येत्या ७ जून रोजी मतदान होणार आहे. महामंडळाच्या २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी पुणे, मुंबई आणि कोल्हापूर येथे मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर विभागाच्या देखरेखीखाली ही निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून रागिणी खडके यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वीच्या निवडणूक प्रक्रियेसंदर्भात न्यायालयीन आदेश आणि अंतिम सभासद यादीच्या पार्श्वभूमीवर सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

जाहीर करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार १७ मे ते २२ मे दरम्यान उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार आहेत. अर्जांची छाननी २५ मे रोजी होईल, तर वैध उमेदवारांची यादी त्याच दिवशी प्रसिद्ध केली जाणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत २७ ते २८ मे अशी ठेवण्यात आली असून, २९ मे रोजी अंतिम उमेदवारांची यादी जाहीर होणार आहे. आवश्यक असल्यास ७ जून रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडेल. त्यानंतर ८ जून रोजी कोल्हापुरात मतमोजणी होणार असून, मतमोजणीनंतर लगेच निकाल जाहीर करण्यात येणार आहे. महामंडळाच्या कार्यकारी मंडळात निर्माता, दिग्दर्शक, लेखक-पटकथाकार, अभिनेते, तंत्रज्ञ, संगीत क्षेत्रातील प्रतिनिधी, स्टुडिओ व प्रयोगशाळा प्रतिनिधी, वितरक तसेच चित्रपट व्यवसायाशी संबंधित विविध घटकांचे प्रतिनिधित्व असणार आहे. निवडणुकीसाठी उमेदवारांना स्वतः उपस्थित राहून अर्ज दाखल करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच निवडणूक अनामत रक्कम पाच हजार रुपये निश्चित करण्यात आली आहे. महामंडळाच्या निवडणुकीकडे मराठी चित्रपटसृष्टीचे लक्ष लागले असून, आगामी काळात प्रचाराला वेग येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# पुणे मुंबई एक्सप्रेसवेवर भीषण अपघात, दोघांचा जागीचं मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

पुणे मुंबई एक्सप्रेसवेवर स्कोडा गाडीचा भीषण अपघात झाला आहे. मुंबईकडून पुण्याकडे येणाऱ्या लेनवर कामशेत हद्दीत हा अपघात झाला आहे. चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने भीषण अपघात झाला आहे. यामध्ये दोन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे तर एक जण गंभीर जखमी आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, पुणे मुंबई एक्सप्रेसवे वर अपघात झालेल्या गाडीमध्ये एकूण ३ जण होते. चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने गाडी डिव्हायडरला जाऊन धडकली. डिव्हायडरचा पत्रा हा थेट गाडीमध्ये घुसल्याने गाडीत असलेले २ जण जागीच ठार झाले. मृत झालेल्यांना बाहेर काढण्यात यश आलं आहे. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# पुण्यातील गर्ल्स हॉस्टेलबाहेरील 'त्या' बंद बॉक्सचं गूढ अखेर उलगडलं

पुणे । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड शहरातील संत तुकाराम नगरमधील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या राजे राजेश्वरी गर्ल्स हॉस्टेलच्या गेटवर सकाळी सव्वा आठच्या सुमारास एक मोठा गिफ्ट बॉक्स आढळून आल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली होती. दरम्यान या प्रकरणात एक महत्त्वाची बाब समोर आली आहे.

नुकत्याच पुण्यात घडलेल्या बॉम्बच्या अफवा आणि घटनांच्या पार्श्वभूमीवर या बॉक्समुळे काही काळ भीतीचं वातावरण निर्माण झालं होतं. हॉस्टेलच्या मुख्य गेटवर कोणीतरी अज्ञात व्यक्ती हा मोठा बॉक्स ठेवून गेली होती. सुरक्षा रक्षकाला या बेवारस बॉक्सचा संशय आल्याने त्याने तातडीने पोलिसांशी संपर्क साधला. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस आणि सुरक्षा यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून परिसराची नाकेबंदी केली आणि अत्यंत काळजीपूर्वक त्या संशयास्पद बॉक्सची तपासणी केली. जेव्हा पोलिसांनी तो बॉक्स उघडला, तेव्हा त्यात एक मोठा टेडी बियर असल्याचं समोर आलं. बॉक्समध्ये कोणतीही धोकादायक किंवा संशयास्पद वस्तू नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलीस आणि विद्यापीठ प्रशासनाने सुटकेचा निश्वास सोडला. हा बॉक्स हॉस्टेलमधीलच एका विद्यार्थिनीसाठी पाठवण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज असून, पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत




आहेत.अखेर अज्ञात व्यक्तीने ठेवलेल्या त्या बॉक्समध्ये टेडिबियर असल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे. दरम्यान हा टेडिबिअर वसतिगृहातील विद्यार्थिनीसाठी ठेवण्यात आल्याचं सांगितलं जात आहे. अद्याप तो टेडिबियर कुणी आणि कुणासाठी ठेवला होता याबाबत कोणतीही माहिती कळू शकलेली नाही. पोलीस या प्रकरणात तपास करीत आहेत.

# पुणे महापालिकेत मोठा प्रशासकीय फेरबदल; २१ अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या बदलल्या

पुणे । प्रतिनिधी

महापालिकेच्या प्रशासनात कार्यक्षमता वाढविण्याच्या उद्देशाने मोठा प्रशासकीय फेरबदल करण्यात आला आहे. अतिरिक्त महापालिका आयुक्त प्रजित नायर यांनी २१ उप आयुक्त आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या विभागीय जबाबदाऱ्यांमध्ये व्यापक बदल केले असून, विविध विभागांचे पुनर्वाटप करण्यात आले आहे. महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील पदोन्नतीनंतर डॉ. संतोष टेंगले यांची उप आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण आणि नगरविकास विभागाच्या आदेशानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. अहिल्यानगर महापालिकेतून पदोन्नतीने पुण्यात आलेल्या डॉ. संतोष टेंगले यांच्याकडे सांस्कृतिक केंद्र आणि क्रीडा विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. प्रसाद काटकर यांची सहाय्यक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्याकडे निवडणूक आणि दक्षता विभागाचा प्रभारी पदभार देण्यात आला आहे.किशोरी शिंदे यांच्याकडील पर्यावरण, मुद्रणालय आणि विशेष विभाग काढून त्यांच्याकडे सामान्य प्रशासन व तांत्रिक विभाग सोपविण्यात आले आहेत. माधव जगताप यांच्याकडे परिमंडळ क्रमांक ५ सोबत पर्यावरण, विशेष उप आयुक्त, मुद्रणालय आणि मंडई विभागाची अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली आहे. सोमनाथ बनकर यांचे विद्यमान विभाग कायम ठेवण्यात आले आहेत. प्रशांत ठोंबरे यांच्याकडील दक्षता विभाग प्रसाद काटकर यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे.संदीप खलाटे यांच्याकडे मध्यवर्ती भांडार विभागाची अतिरिक्त जबाबदारी दिली असून, संदीप कदम यांच्याकडे मोटार वाहन आणि आकाशचिन्ह परवाना विभाग सोपवला आहे. संतोष वारुळे यांच्याकडे घनकचरा विभागाचा पूर्ण पदभार दिला. वसुंधरा बारवे यांच्याकडे शिक्षण विभागासह आकाशचिन्ह आणि परवाना विभाग कायम ठेवले. विजयकुमार थोरात यांना सामान्य प्रशासन आणि तांत्रिक विभागातून मुक्त करून परिमंडळ क्रमांक ३ ची जबाबदारी दिली आहे. आशा राऊत यांच्याकडे परिमंडळ क्रमांक १ सोबत समाजविकास आणि समाजकल्याण विभाग सोपविण्यात आले आहेत. तुषार बाबर यांच्याकडे माहिती व जनसंपर्क, सोशल मीडिया कक्ष आणि सुरक्षा नियंत्रण विभागाची जबाबदारी दिली आहे. आपत्ती व्यवस्थापन अधिकारी गणेश सोनुने यांना प्रभारी पदभार सोपवला असून, ई-प्रशासक राहुल जगताप यांच्याकडे माहिती तंत्रज्ञान विभाग कायम ठेवला आहे. कर आकारणी विभागाची जबाबदारी पुन्हा एकदा रवी पवार यांच्याकडेच दिली आहे. या प्रशासकीय फेरबदलामुळे विभागीय कामकाज अधिक गतिमान होईल, अशी अपेक्षा महापालिका प्रशासनाने व्यक्त केली. नव्याने जबाबदाऱ्या मिळालेल्या सर्व अधिकाऱ्यांना तत्काळ पदभार स्वीकारून त्याबाबतचे निवेदन सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# पुणे महापालिकेत थेट 'मुन्नाभाई' स्टाईल भरती; पालिकेचा लोगो, शिक्के अन् ट्रेनिंग लेटरही

पुणे । प्रतिनिधी

पुण्यामध्ये सरकारी नोकरी मिळवण्याचं स्वप्न पाहणाऱ्या तरुणांसाठी एक अत्यंत धक्कादायक बातमी आहे. पुणे महानगरपालिकेत नोकरीला लावतो असे आमिष दाखवून सुशिक्षित बेरोजगारांना करोडो रुपयांचा गंडा घालणारे एक मोठे रॅकेट उघडकीस आले आहे. विशेष म्हणजे हे रॅकेट इतक्या सराईतपणे चालवले जात होते की, उमेदवारांना चक्क महापालिकेच्या नावाचे बनावट शिक्के असलेली नियुक्तीपत्रे आणि ट्रेनिंग लेटर सुद्धा देण्यात आली होती. या संपूर्ण प्रकारामुळे पुणे शहरात मोठी खळबळ उडाली असून यामध्ये पालिकेतील काही बड्या अधिकाऱ्यांचे साटेलोटे असण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी दिलेल्या माहितीनुसार, हे रॅकेट चालवणारे संशयित अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने तरुणांना आपल्या जाळ्यात ओढत होते. मिळालेल्या माहितीनुसार, शिवानंद पाटील, नमिता बनसोडे आणि राजेंद्र खेडेकर यांच्या विरोधात या प्रकरणी तक्रारी दाखल झाल्या आहेत. हे लोक महापालिकेतील वरिष्ठ अधिकारी आपले ओळखीचे आहेत आणि तेच ही भरती करत




असल्याचे भासवत होते. विश्वास बसण्यासाठी या टोळीने चक्क महानगरपालिकेच्या शेजारी असलेल्या रेस्टॉरंटमध्ये उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. यामुळे कोणत्याही तरुणाला संशय येत नव्हता आणि ते सरकारी नोकरीच्या आमिषाला बळी पडत होते.या रॅकेटची व्याप्ती किती मोठी आहे याचा अंदाज एका विद्यार्थ्याच्या तक्रारीवरून येतो. या विद्यार्थ्याकडून सरकारी नोकरीसाठी तब्बल ४५ लाख रुपये घेण्यात आले होते. अशा प्रकारे अनेक बेरोजगार युवकांकडून लाखो रुपये उकळून त्यांना बनावट नियुक्तीपत्रे, वर्क ऑर्डर आणि ट्रेनिंग लेटर देण्यात आली. इतकेच नाही तर आरोपींनी बनावट कर्मचारी उभे करून त्यांच्या नावाने खोट्या पगार पावत्या देखील तयार केल्या होत्या. ज्या उमेदवारांनी आपले पैसे परत मागितले, त्यांना तुमची नोकरी कायम झाली आहे अशी खोटी कागदपत्रे देऊन पुन्हा फसवण्यात आले. विजय कुंभार यांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे. या रॅकेटमध्ये पुणे महापालिकेतील काही अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांचा थेट सहभाग असल्याशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणावर बनावट कागदपत्रे आणि शिक्के तयार करणे शक्य नाही, असे त्यांनी म्हटले आहे. या प्रकरणाची तक्रार ३० जानेवारी २०२६ रोजी आयुक्त आणि पोलिसांकडे करण्यात आली होती, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.